रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३३० | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ७ मे २०२४

किंमत ४ ₹


## मोहाडी गावाचा मतदानावर बहिष्कार

**पेण :** पाबळ खोऱ्यातील निसर्गाने नटलेला गाव म्हणजे मोहाडी. परंतु, आजही हे गाव मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. डोंगरी भाग असल्याने ना लोकप्रतिनिधी लक्ष देत, ना प्रशासकीय अधिकारी. त्यामुळे येथील ग्रामस्थांनी पेणचे सहायक निवडणूक अधिकारी तथा प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांना निवेदनाद्वारे आपली व्यथा मांडली असून, लोकसभेच्या निवडणुकीत मतदान न करण्याचा निर्णय घेतला आहे. आजच्या स्थितीला या गावात जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नाही. निगड्याच्या नदीवर जो पूल बांधलेला आहे, पान ५ वर

## ठाण्यात रोहन बारावीत देशात पहिला

**मुंबई :** कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेशन (सीआयएससीई) ने सोमवारी दहावी आयसीएसई आणि बारावी आयएससी परीक्षा वर्ष २०२४ चे निकाल जाहीर केले. दरम्यान, ठाण्यातील रेहान सिंह बारावी आयसीएसई बोर्डात देशात अव्वल ठरला आहे. या निकालात मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९९.६५ टक्के असून, मुलांची उत्तीर्ण टक्केवारी ९९.३१ टक्के एवढी आहे. भारतामध्ये दक्षिणेकडील प्रदेशाने उत्तीर्ण होण्याची सर्वाधिक ९९.५३ टक्केवारी नोंदवली आहे. त्यानंतर पश्चिम विभागाचे उत्तीर्णतेचे प्रमाण ९९.३२ टक्के आहे.

## अलिबागसह रोहा, दापोली, गुहागरमधील सहा संवेदनशील केंद्र

## १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

# आज मतदान



देशातील १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील ९४ जागांसाठी मतदान

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**रायगड लोकसभा मतदार संघातील अलिबाग, श्रीवर्धन, महाड, दापोली, गुहागर या पाच विधानसभेतील दोन हजार १८५ मतदान केंद्रांवर मंगळवारी (दि. ७) तिसऱ्या टप्प्यातील मतदान होणार आहे. १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे.**
**यातील अलिबागमधील दोन, रोह्यामधील एक, दापोलीमधील एक व गुहागरमधील दोन अशी सहा मतदान केंद्र संवेदनशील असणार आहेत. या ठिकाणी पोलिसांची कुमक अधिक ठेवली जाणार आहे.**

महिन्याभरापासून मतदारसंघातील अनेक भागात प्रचार रॅली, सभा घेण्यात आल्या. वेगवेगळ्या पक्षातील उमेदवारांनी आपापल्या परीने मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. आता मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनासह पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे.

**राज्यात ११ मतदारसंघात**
महाराष्ट्रातील बारामती, रायगड, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी–सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांचा यात समावेश आहे.

### मतदारांवर दृष्टिक्षेप

- एकूण मतदार – १६ लाख ६८ हजार ३७२
- घरुन मतदान करणारे मतदार – तीन हजार ८४
- ८५ पेक्षा अधिक वय असणारे मतदार – तीन हजार ८२
- सर्विस मतदार – एक हजार ३५०
- एनआरआय मतदार – ५७
- दिव्यांग मतदार – ८ हजार

### मतदान केंद्रावर चोख व्यवस्था

मतदान केंद्रापासून शंभर मीटर अंतरावर कोणालाही फिरकू दिले जाणार नाही. प्रत्येक मतदान केंद्रामध्ये केंद्राध्यक्षासह शिपाईपर्यंत सहा कर्मचारी असे एकूण १३ हजारांहून अधिक कर्मचारी दोन हजार १८५ केंद्रांमध्ये असणार आहेत. जिल्ह्यातील ५५० मतदान केंद्रांमध्ये मंडपची व्यवस्था केली असून, काही मतदान केंद्रामध्ये पाळणाघराचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

### भयमुक्त वातावरणात मतदान करा

निवडणुकीबरोबरच मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी जिल्ह्यात योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या कालावधीत कोणीही कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करेल, त्यांच्याविरोधात कठोर कारवाई केली जाईल. मतदारांना मनमोकळेपणाने दबावमुक्त व भयमुक्तपणे वातावरणामध्ये मतदान करता यावे यासाठी तयारी केली आहे, असे रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले आहे.

### संवेदनशील केंद्र

अलिबाग विधानसभा मतदारसंघातील नवेदर नवगावमधील दोन, श्रीवर्धन मतदारसंघातील रोहा नगरपरिषदेमधील एक, गुहागर मतदारसंघातील धोपावे, साखरी आगरमधील दोन व दापोली मतदारसंघातील वाझंलोली आमखोलमधील एक अशी सहा मतदान केंद्र संवेदनशील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



## मतदार तटकरेंना धक्का देण्याच्या तयारीत?

- आज पार पडणार मतदान प्रक्रिया
- अनंत गीतेंसह अन्य उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात होणार बंद

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा रविवारी थंडावल्या. मंगळवारी ७ मे रोजी सकाळी सात ते सांयकाळी सहा या वेळेत मतदान पार पडणार आहे. इंडिया आघाडीतील शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते आणि महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) सुनील तटकरे यांच्यामध्येच थेट लढत होत आहे. गेल्या १५ दिवसांपासून सुरु असलेल्या प्रचाराच्या रणांगणावर नजर फिरवल्यास रायगड-रत्नागिरीमधील मतदार तटकरेंना धक्का देण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येते.

रायगड लोकसभा मतदारसंघामध्ये अलिबाग, पेण, महाड आणि श्रीवर्धन मतदारसंघ आहेत. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर आणि दापोली या मतदारसंघाचादेखील समावेश होतो. तटकरे यांच्या बाजूने भाजपाने पूर्ण शक्ती पणाला लावली. तटकरेंकडे पेणचे भाजपाचे आमदार रवींद्र पाटील, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, महाड शिवसेनेचे आमदार भरत गोगावले दोघेही शिवसेना (शिंदे गट) तसेच श्रीवर्धनच्या आमदार तथा मंत्री आदिती तटकरे आणि तटकरे स्वतः खासदार आहेत. असे असले तरी, तटकरेंनी ज्या शिंदे गटाची मदत घेतली आहे, त्या आमदारांवर माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गद्दारीचा शिक्का मारला आहे. त्यामुळे मतदारांची सहानुभूती ही शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अनंत गीते यांच्यासोबत असल्याचे सर्वांनीच पाहिले आहे. त्याचप्रमाणे तटकरे हे भ्रष्टाचारातून मुक्तता मिळवण्यासाठी पान ५ वर

# आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या पुढे नेऊ



## राहुल गांधींची मोठी घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
आरक्षणाच्या मागणीसाठी देशभरातील विविध राज्यांमध्ये मोठी आंदोलने झाली आहेत. महाराष्ट्रातही मराठा आरक्षणासह इतर काही जातसमूहांचे आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोमवारी मोठी घोषणा केली.

सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली आरक्षणावरील ५० टक्क्यांची मर्यादा आमचे सरकार आल्यास हटवून टाकू, असे राहुल गांधी म्हणाले. या निर्णयाचा लाभ दलित, मागासवर्गीय आणि आदिवासी जमातींना होणार असल्याचेही ते म्हणाले. धर्माच्या आधारावर आरक्षणाचा आरोप काँग्रेसवर करण्यात आला होता. या आरोपाला या माध्यमातून राहुल गांधी यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

रतलाम येथील सभेला संबोधित करत असताना राहुल गांधी म्हणाले, ही निवडणूक संविधानाला वाचविणारी निवडणूक ठरणार आहे. भाजपा आणि राष्ट्रीय स्वंयसेवक संघ संविधानाला संपवू इच्छितो. यासाठी त्यात बदल करणार असल्याचे त्यांचे नेते सांगतात. काँग्रेस आणि इंडिया आघाडी संविधानाचे रक्षण करण्याची लढाई लढत आहे. संविधानाने इथल्या लोकांना जल, जमीन आणि जंगल या साधनसंपत्तीवर अधिकार दिले. नरेंद्र मोदींना हे अधिकार हिसकावून घ्यायचे असल्यामुळेच त्यांना पूर्ण बहुमत हवे आहे. राहुल गांधी यांनी संविधानाची प्रत हातात घेऊन हा मुद्दा लोकांना सांगितला.

राहुल गांधी यांनी भाजपाच्या ४०० पार घोषणेवरही टीका केली. ते म्हणाले, भाजपाच्या नेत्यांनी संविधान बदलण्यासाठी ४०० जागा जिंकून द्या, असे आवाहन केले आहे. पण ४०० विसरा, त्यांना आता १५० जागाही जिंकणे अवघड झाले आहे. ते सांगतात की, सत्तेत आल्यानंतर आरक्षण हटवू. पण मी आज या मंचावरून जाहीर करतो की, आरक्षण कुणी हटवू शकत नाही. उलट आम्ही जर सत्तेत आलो तर आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्याही पुढे नेऊ. गरिब, दलित, वंचित आणि आदिवासींना अधिकाधिक आरक्षण देण्याचा आमचा प्रयत्न असेल, अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली.

रतलाम येथील सभेत राहुल गांधी यांनी आदिवासींवरील अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले की, आदिवासींविरोधात होणाऱ्या अत्याचाराची बातमी दाखविली जात नाही. आदिवासींच्या मुलींवर बलात्कार होतात. त्यांची जमीन बळकावली जाते. पण माध्यमे मौन बाळगून असतात. त्याला कारण म्हणजे आदिवासींचे माध्यमांत प्रतिनिधित्व नाही.



● मतदानाच्या पूर्वसंख्येला सोमवारी मतदान अधिकारी मतपेट्या घेऊन नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवर रवाना झाले. निवडणूक अधिकाऱ्यांकडून त्यांना ईव्हीएम मशीन व अन्य मतदान साहित्य सुपूर्द करण्यात आले. (छायाचित्र : समीर मालोदे)



## विदेशी प्रतिनिधींचे भारतीय पारंपरिक पद्धतीने औक्षण

- फेटा, हार घालून जिल्हाधिकारी जावळेंनी केले स्वागत
- मतदान साहित्य वाटप-वाहतूक प्रक्रिया पाहणी आणि स्ट्राँग रूमला भेट

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
विदेशी प्रतिनिधींचे मंडळ निवडणूक प्रक्रियेची पाहणी करण्याकरिता सोमवारी सकाळी दाखल झाले. अलिबाग विधानसभा मतदारसंघातील मतदान अधिकारी आणि पथकाच्या साहित्य वाटप, वाहतूक आणि स्ट्राँग रूम तसेच मतमोजणी कक्षाची त्यांनी पाहणी केली.

भारत निवडणूक आयोगाने इतर देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्था यांच्याबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सहभागासाठी कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यानुसार रायगडमध्ये पान ५ वर

## एसटी फेऱ्या रद्द, प्रवाशांचे हाल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रात निम्म्याहून अधिक एसटी बसेस पाठविण्यात आल्या. त्याचा फटका सोमवारी सकाळी व संध्याकाळी प्रवाशांना बसला. प्रवाशांना निश्चित स्थळी वेळेवर जाता आले नसल्याने त्यांचे प्रचंड हाल झाले. विशेष म्हणजे, महिलावर्गासह ज्येष्ठ नागरिक व तरुणवर्गालाचा त्याचा फटका बसला.

रायगड लोकसभा मतदारसंघातील दोन हजार १८५ मतदान केंद्रावर मतदान मंगळवारी होणार आहे. मतदार केंद्रात कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी २८७ एसटी बसेस केंद्रात पाठविण्यात आली आहेत. त्यामुळे सोमवारी सकाळी कामावर जाणारे कर्मचारी, शिकवणीसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसह दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. एसटी फेऱ्या बंद झाल्याचा फटका प्रवाशांना बसला. त्यामुळे अनेकांनी एसटीच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. सकाळपासून एसटी फेऱ्या बंद झाल्याने अनेक प्रवाशांना मनस्ताप झाला. तासन्‌तास बसस्थानकांसह नाक्या-नाक्यावर बसची वाट पाहावी लागली. सोमवारी कामावर जाणाऱ्या नागरिकांसह प्रवासी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेत जाता आले नाही. दरम्यान, काहींनी खासगी वाहनांसह मिळेल त्या वाहनाचा आधार घेत वेळेत पोहोचण्याचा प्रयत्न केला. एसटी महामंडळाने फेऱ्या बंद करण्यापूर्वी प्रवाशांना सूचना करणे अपेक्षित होते, अशी संतापजनक प्रतिक्रिया अनेक प्रवाशांनी व्यक्त केली.



● (छायाचित्र : समीर मालोदे)

## करकरेंचा मृत्यू पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीने?

**मुश्रीफांचे गौप्यस्फोट, उज्ज्वल निकमांवरही आरोप**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
वरिष्ठ पोलीस अधिकारी हेमंत करकरे यांचा मृत्यू दहशतवादी अजमल कसाब याच्या गोळीने झाला नाही, असा दावा लेखक एस.एम. मुश्रीफ यांनी केला आहे. 'हू किल्ड करकरे' या पुस्तकात त्यांनी केलेल्या या दाव्याने खळबळ उडाली. २६/११ हल्ल्याची माहिती गुप्तचर यंत्रणांना एक आठवडा आधी मिळालेली होती, असा उल्लेखही या पुस्तकात करण्यात आला.

या पुस्तकातल्या आरोपांबाबत एस.एम. मुश्रीफ यांनी पुन्हा एकदा प्रतिक्रिया दिली आहे. 'माझ्या पुस्तकात पान ५ वर

## आरटीईच्या सुधारणेस स्थगिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
राज्य सरकारनं राईट टू एज्युकेशन कायद्यांतर्गत अर्थात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत शालेय प्रवेशाबाबत केलेल्या नव्या सुधारणेला मुंबई उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळं हे नवे नियम तूर्तास लागू होणार नाहीत.



आरटीईकायद्यातील सुधारणेबाबत ९ फेब्रुवारी रोजी अधिसूचना राज्य सरकारनं काढली होती. याविरोधात एका सामाजिक संस्थेनं न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्याचबरोबर मनसे नेते अमित ठाकरे यांनीसुद्धा या नियमाला विरोध केला होता. कायद्यातील नव्या तरतुदींनुसार शाळांना दिलेल्या सवलतींमुळं सर्वसमावेशक शैक्षणिक धोरणाला तडा जात असल्याचा आरोप या याचिकेतून करण्यात आला आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील नव्या सुधारणेनुसार १ किमीच्या जवळपास खासगी व अनुदानित शाळांमध्ये दुर्बल घटकांतील २५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सक्ती असणार नाही. या निर्णयामुळं या कायद्याच्या मूळ हेतूलाच हरताळ फासण्यात आला होता. यामुळं खासगी शाळा दुर्बल घटकातील मुलांना प्रवेश देणारच नाहीत, असा आरोप केला जात आहे. सन २०२४-२५च्या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन प्रवेशाची मुदत १० मेपर्यंत आहे. पण सध्या मुंबई उच्च न्यायालयाच्या या नव्या नियमाला दिलेल्या स्थगितीमुळं कायद्यातील सुधारणा तूर्तास लागू होणार नाही.

# मतदारांनो, बिनधास्त मतदानाला जा!

- मतदान केंद्रांवर मिळणार ग्लुकोज-डी, ओआरएस, बीपी, शुगची गोळी
- आशा वर्करसह आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**
मे महिना सुरू होताच सूर्य अक्षरशः आग ओकत असून, जिल्ह्यातील तापमानाने चाळिशी गाठली आहे. त्यातच उद्या मंगळवारी लोकसभा निवडणुकीसाठी तिसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर मतदारांची काळजी घेण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने मतदान केंद्रांवर ग्लुकोज डी, ओआरएससह बीपी, शुगर व इतर औषधे देण्याची व्यवस्था केली आहे. त्यासाठी आशा वर्करसह आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूकसुद्धा करण्यात आली असून, ते मतदारांची काळजी घेणार आहेत. त्यामुळे मतदारांनी मतदानासाठी बिनधास्त बाहेर पडावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



(संग्रहित छायाचित्र)

रायगड लोकसभा मतदारसंघातील मतदान मंगळवारी (दि. ०७) मे रोजी दोन हजार १८५ केंद्रांमध्ये होणार आहे. १६ लाख ६८ हजार ३७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान केंद्रावर येणाऱ्या मतदारांच्या आरोग्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग सज्ज झाला असून, प्रथमोपचारासह आशा सेविकांसह आरोग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे मतदानाला बिनधास्त या, असे आवाहन जिल्हा परिषदेकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यामध्ये तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. उन्हाचा पार चढत आहे. उन्हाचे चटके बसत असल्याने बाहेर पडणेदेखील नकोसे झाले आहे. मात्र, सात मे रोजी केंद्रामध्ये मतदान करण्यास जाणाऱ्या मतदारांच्या सेवेसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याची माहिती देण्यात आली आहे.

मतदान केंद्रावर रांगेत उभे राहणाऱ्यांना उन्हाचा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी ओआरएस पावडर, इतर औषधांचा साठा उपलब्ध करण्यात आला आहे. दोन हजार ८५ केंद्रांवर प्रथमोपचार कीट ठेवण्यात आले आहेत. या केंद्रावर आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर व समन्वय वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रांसह उपजिल्हा रुग्णालयातील यंत्रणांचे लक्ष राहणार आहे. तसेच १०८ सह १०२ क्रमांकाची रुग्णवाहिकादेखील ठिकठिकाणी उपलब्ध असणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनिषा विखे यांनी दिली.

## देवेंद्र फडणवीसांच्या सभेत चिमुकल्यांची पोटासाठी धडपड

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**
पोटात भूक असताना ती मिटावी यासाठी दोन चिमणी पाखरांची धडपड सोमवारी (दि. ६) राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेत दिसून आली. मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ खारघर येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला उपस्थित कार्यकर्त्यांसाठी नाश्त्याचे बॉक्स आणि पाण्याच्या बाटल्यांची सोय करण्यात आली होती. नाश्ता झाल्यावर ते रिकामे बॉक्स आणि प्लास्टिकच्या बाटल्या जागेवरच टाकल्या जात होत्या. त्या जमा करुन आपल्या पोटाची भूक भागवण्यासाठी



दोन चिमुकल्यांची धडपड सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. परंतु, एरव्ही विकासाच्या बाता मारणारे नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे भुकेने व्याकूळ झालेल्या त्या चिमुकल्यांकडे झालेले दुर्लक्ष दुर्दैवच म्हणावे लागेल.

हातात कचरा गोळा करण्यासाठी घेतलेली पिशवी, पायात चप्पल नाही, अशा अवस्थेत ही चिमणी पाखरं कचरा गोळा करताना एरव्ही हमखास दिसतात. परंतु, आज या सभेत रिकामे बॉक्स, रिकाम्या बाटल्या गोळा करीत होती. परंतु, त्यांची भूक शमविण्यासाठी कोणी कार्यकर्ता पुढे आला नाही, हेच सत्य आहे.




# ठाण्यात ठाकरेंचा निर्धार

## गद्दारांचे डिपॉझीट जप्त होणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

गद्दारांना गाडा ही फक्त घोषणा असता कामा नये. ही शिवसेना ठाण्याची शिवसेना आहे. आनंद दिघेंचे वाक्य होतं की, गद्दारांना क्षमा नाही. चित्रपटाच्या निमित्ताने समोर आले ते त्यांना स्वत:ला समजायला पाहिजे. ते आता ठाणेकर करुन दाखवणार आहेत. गद्दारांना क्षमा नाही. राजन विचारे निष्ठावंत शिवसैनिक आहे, राजन विचारेंनी स्टॅंडिंग कमिटी सोडली नसती तर हे भूत जन्मालाच आले नसते. आनंद दिघेंचा मृत्यू झाला पण त्यांनी भगवा सोडला नाही. याला निष्ठा म्हणतात. गद्दारांना निष्ठा काय असते हे शिकवण्याची नाही तर दाखवण्याची वेळ आली आहे. मला खात्री आहे की, राजनचा विजय तर होणार आहेच. पण राजन विचारेंचा विजय हा गद्दारांचे डिपॉझिट जप्त करुनच झाला पाहिजे. फक्त गोंधळून जाऊ नका. धनुष्यबाण चोरांच्या हातात आहे, असे



शिवासेना प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचारार्थ उद्धव ठाकरेंची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी ठाकरेंनी एकनाथ शिंदे यांच्यासह मोदी-शाहांवर जोरदार हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे म्हणाले, मोदीजी तुमच्या पराभवामुळे भारतात जल्लोष होणार आहे. नवाब शरीफ यांच्या वाढदिवसाला केक खायला मोदी गेले होते. १० वर्षात ५६ इंच छाती १५६ इंच झाली पाहिजे होती. जो कामाचा नाही. तो रामाचा कसा होईल? राम राज्य पाहिजे. तुम्ही काहीच काम केले नाही. ८० कोटी जनतेला तुम्ही जेवण देताय? आम्ही यांच्या हाताला काम देणार आहोत. मुस्लिम, ख्रिश्चन समाज आमच्या बरोबर येत आहे. एक वेळी लोक मोदी मोदी बोलायचे आता हुकूमशहा बोलत आहेत. हे सरकार गजनी सरकार.. काल काय बोललेले आज आठवत नाही. यांच्याकडे धुणीभांडी करणारा निवडणूक आयुक्त आहे. कोशारी तुमचा नोकर होता. त्याने छत्रपती, फुलेंचा अपमान केला. काही बोलले नाही? सुप्रिम कोर्टाने सांगितले कोशारी चुकीचे होते. मोदी तुम्ही सर्वेच्च न्यायालयावर दबाव आणताय.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, परभणीची सभा, कोल्हापूरची सभा, धाराशिवची सभा आणि सगळ्याच पाहा. धारशिवची जी सभा होती, अंगावरची रोमांच यावा, लाखो लोक आणि आपण आईचा गोंधळ घालतो. आई तुळजाभवानी गोंधळाला आली होती, असे त्या सभेचे स्वरुप होते. लोक पेटले आहेत, चिडले आहेत. कधी एकदा मतदानाची तारिख येते आणि यांना रिटायर नाही तर गेटआऊट करण्याची लोक वाट पाहात आहेत. किती मस्ती आली आहे. एकतर यांच्यामध्ये समोरासमोर लढण्याची हिंमत नाही. माझा शिवसैनिक निष्ठावान आहे. यांनी माझ्या मढवींना तुरुंगात टाकलं, मी उद्या यांना तुरुंगात टाकणार आहे.

# ‘चहावाल्याचे दुकान फक्त साखरवाला बंद करू शकतो’

। बारामती । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील तिसऱ्या टप्प्यांतील ११ जागांवर मंगळवारी (दि.७) मतदान होणार आहे. या अकरा जागांमध्ये महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या बारामती मतदारसंघाचाही समावेश आहे. दरम्यान, तिसऱ्या टप्प्यातील जागांवरील प्रचाराच्या तोफा रविवारी (दि.५) सायंकाळी थंडावल्या. त्यापूर्वी बारामती येथे सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाची प्रचाराची सांगता सभा बारामतीत पार पडली.

दरम्यान, या सांगता सभेला तरुणांपासून वृद्धांपर्यंत आणि तरुणींपासून वृद्ध महिलांपर्यंत



सर्वांनी जोरदार प्रतिसाद दिला. या सर्व घडामोडीत एक तरुण सर्वांचे लक्ष वेधत होता. या तरुणाच्या हातात फलक धरलेला फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

बारामतीतील या सभेला शरद पवार यांचे आगमन होण्यापूर्वी या तरुणाने सभेच्या ठिकाणी एक फलक झळकावला. ज्यावर लिहिले होते, ‘चहावाल्याचं दुकान फक्त साखरवला बंद करू शकतो…’ या फलकातून तरुणाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अप्रत्यक्षपणे टोला लावला. कारण पंतप्रधान मोदी यांनी २०१४ च्या लोकसभेच्या प्रचारात, त्यांनी लहाणपणी रेल्वे स्टेशनवर चहा विकला असल्याचे सांगितले होते. दुसरीकडे शरद पवार हे देशातील सहकार क्षेत्रातील दिग्गज मानले जातात. आपल्या कारकिर्दीत पवारांनी अनेक साखर कारखाने चालवले आहेत. त्यामुळेच या फलकातून तो झळकवणाऱ्या तरुणाला, ‘पवार मोदींचे दुकाण बंद पाडणार,’ असे म्हणायचे असल्याच्या चर्चा सोशल मीडियावर सुरू झाल्या आहेत.

# जे.पी.गावितांची माघार भास्कर भगरेंना पाठिंबा

। दिंडोरी । प्रतिनिधी ।

दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपकडून डॉ. भारती पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून भास्कर भगरे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. मात्र, माकपचे माजी आमदार जे.पी.गावित यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आता जे.पी.गावित यांनी दिंडोरी लोकसभेतून माघार घेतली आहे. तसेच, शरद पवार गटाचे उमेदवार भास्कर भगरे यांना पाठींबा जाहीर केला आहे. जे.पी. गावित म्हणाले की, माकपतर्फे लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी



अर्ज भरला होता. मात्र, दिंडोरीची जागा महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला देण्यात आली आहे. राष्ट्रवादीचा एकच उमेदवार पाहिजे, अशी विनंती राष्ट्रवादीकडून करण्यात आली. तसेच, माकप पक्षाने देखील आम्हाला सुचना केल्याने मी दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मागे घेत आहे. मात्र, आता भाजप आणि राष्ट्रवादी अशी लढत दिंडोरीत होईल. त्यामुळे या लढतीचा परिणाम काय होईल, याबाबत सांगता येणार नाही. तसेच, आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार भास्कर भगरे यांना पाठींबा देत आहोत.

### आता खासदार व्हा!

**पुणे :** कसबा जिंकून आमदार झालात, आता खासदार होऊन पुण्याच्या विकासाचे प्रश्न सोडवा, त्यासाठी आमचे आशीर्वाद तुम्हाला आहेत, अशा भावना महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार आमदार रवींद्र धंगेकर यांच्याबाबत कसबावासीयांनी व्यक्त केल्या. कसबा विधानसभा मतदारसंघातील परिसरात झालेल्या पदयात्रेत नागरिक आपल्या भावना व्यक्त करत होते. ही पदयात्रा अखिल मंडई मंडळाच्या श्रींची आरती करून सुरू झाली. महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यास धंगेकर यांनी पुष्पहार अर्पण करून वंदन केले. मंडई मंडळापासून सायंकाळी ६ वाजता ही पदयात्रा सुरू झाली.

# मराठी लोकांना नोकरी नाकारणं दुर्दैवी: रोहित पवार

। बारामती । प्रतिनिधी ।

मुंबईतील गुजराती माणसाचा आत्मविश्वास हा सध्या वाढला आहे. कारण त्यांना माहिती आहे की, येथील राजकारणी आपल्या पाठिशी आहेत. याच आत्मविश्वासातून दक्षिण मुंबईत मराठी माणसांना नोकरी नाकारण्यात आल्याचा प्रकार घडला. ही घटना दुर्दैवी आहे, असे मत शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केले. ते सोमवारी बारामतीमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी सध्या मुंबईत सुरु असलेल्या मराठी विरुद्ध गुजराती वादावर भाष्य केले.



सध्या गुजराती नेत्यांचा आत्म विश्वास आणि अहंकार वाढला आहे. वरुन एक आदेश आला की, महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जातात. त्यामुळे गुजराती नेत्यांचा अहंकार वाढला आहे. त्यामधूनच गुजराती कंपन्यांकडून मराठी माणसांना नोकरी नाकारण्याचे प्रकार घडत आहेत. हे असे होत असेल तर मराठी लोकांची ताकद दाखवून द्यावी लागेल, असे रोहित पवार यांनी म्हटले. मराठी संस्कृतीचा ध्वज दिमाखात मिरवणाऱ्या मुंबईच्या गिरगाव परिसरातील एका नोकरीसाठी देण्यात आलेल्या जाहिरातीवरुन सध्या सोशल मीडियावर वाद सुरु आहे.

### दिंडोरीत सर्वाधिक उच्चशिक्षीत उमेदवार

**दिंडोरी :** लोकसभेत पोचल्यानंतर मतदारसंघाचे प्रश्न मांडण्यासाठी हिंदी व इंग्रजीचा वापर होत असल्याने उमेदवारांच्या शिक्षणाला हल्ली फार महत्त्व प्राप्त झाले आहे. नाशिकच्या उमेदवारांपेक्षा दिंडोरी या राखीव मतदारसंघातील उमेदवार उच्चशिक्षित असल्याचे दिसून येत आहे. नाशिकमध्ये डिप्लोमा विरुद्ध डिग्री अशी लढाई होणार आहे. दिंडोरीत एमबीबीएस विरुद्ध एमएबीएड अशी लढत रंगलेली दिसून येते. जिल्ह्यातील नाशिक व दिंडोरी या दोन मतदारसंघांतील उमेदवारांच्या शिक्षणाची तुलना केली, तर नाशिकमध्ये दिंडोरीतील उमेदवारांपेक्षा कमी शिकलेले उमेदवार आहेत.

# रोहित पवारांचा अजितदादांवर पलटवार

। बारामती । प्रतिनिधी ।

बारामती मतदारसंघात प्रचाराच्या शेवटच्या दिवशी शरद पवार गट आणि अजित पवारांच्या गटाकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यावेळी बारामतीच्या सभेत रोहित पवार हे शरद पवारांविषयी बोलताना भावूक झाले. त्यांना बोलताना अश्रू अनावर झाले आणि त्यांचा कंठ दाटून आला होता. त्यांच्या भाषणाची ही क्लीप चांगलीच व्हायरल झाली होती. नेमक्या त्याचवेळेला अजित पवार हेदेखील बारामतीत प्रचारासाठी अखेरची सभा घेत होते. तेव्हा अजित पवारांनी रोहित पवार यांचा व्हिडिओ दाखवत त्यांची खिल्ली उडवली होती. अजित पवारांच्या या कृतीला रोहित पवार यांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिले आहे.



अजितदादा तुम्ही माझी ॲक्टिंग केल्याचं समजलं, पण नोटीस आल्यावर तुमच्या डोळ्यातील अश्रूप्रमाणे माझे मगरीचे नक्राश्रू नाहीत. माझ्या डोळ्यातील अश्रू हे तुम्ही पक्ष फोडल्यानंतर साहेब जे बोलले ते शब्द ऐकून आलेले खरे अश्रू आहेत आणि त्यासाठी विचार, काळीज, जिवंत मन आणि अंगात माणूसपण असावं लागतं अजितदादा. आणि हो वडिलांना सोडून जाण्याइतका मी पाषाणहृदयी नाही, असा पलटवार रोहित पवारांनी केला आहे.

## वे|ध|क

### तुमच्यासारखा गद्दार नाही : विचारे

**ठाणे :** तुमच्यासारखा गद्दार नाही, मला बोलायला लावू नका, उरली सुरली राहू द्या. नरेश म्हस्के काँग्रेसमध्ये जात होता, उद्धव ठाकरे म्हणाले म्हणून त्याला मी थांबवले. याच नरेश म्हस्केला राजन विचारे घेऊन आला होता. तो काँग्रेसमध्ये चालला होता, शिवाजी मैदानमध्ये त्याचा प्रवेश होता. त्यावेळेला मी त्याला थांबवले, असे म्हणत ठाकरे गटाचे ठाण्याचे उमेदवार राजन विचारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला. राजन विचारे म्हणाले, २०१४ ला यांच्या मुलासाठी संपूर्ण सैन्य घेऊन कल्याणला गेले होते. राजन विचारेंना वाऱ्यावर सोडून शिंदे कल्याणला गेले होते, तेव्हा वृत्तपत्रांमध्ये बातम्याही आल्या होत्या. त्याही परिस्थितीत मी निवडणूक लढलो आणि निवडून आलो. फक्त त्यांचा मुलगा आणि ते एवढंच त्यांचे राजकारण होते. माझ्याकडे खोके नव्हते, मी पैशाच्या जीवावर निवडून आलो नाही. आनंद दिघे आणि उद्धव ठाकरेंमुळे मला सर्वकाही मिळालं.

### बारामतीत पोरीसाठी आई मैदानात

**बारामती :** लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून मंगळवारी मतदान होत आहे. सुप्रिया सुळेंच्या प्रचारासाठी बारामतीमध्ये सांगता सभा घेण्यात आली. तत्पूर्वी रविवारी दुपारी प्रचाराच्या तोफा थंडावल्या. यावेळी, बारामतीमध्ये शरद पवार यांनी लेकीच्या प्रचारासाठी बारामती गाजवली. विशेष म्हणजे सुप्रिया सुळेंच्या आई प्रतिभा पवार याही शरद पवारांचा फोटो हाती घेत लोकसभा निवडणुकीत लेकीला पाठबळ देण्यासाठी पदर खेचून मैदानात होत्या. दरम्यान, बारामतीमधील सभेत बोलताना शरद पवार यांचा घसा बसला होता, शब्द फुटेना गेले, त्यांचा आवाज कातर झाल्याचं पाहायला मिळालं.

# सुप्रिया सुळे झाल्या भावूक

। पुणे । प्रतिनिधी ।

आधी कुणी थोडं जरी बोललं, तरी माझ्या डोळ्यात पाणी यायचं. पण गेल्या दहा महिन्यात मी घट्ट झाले. इतकं रडून झालं आहे की आता अश्रू येत नाही, असं महाविकास आघाडीच्या बारामती लोकसभेच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. बारामतीमध्ये सुप्रिया सुळेंच्या प्रचाराची सांगता सभा रविवारी पार पडली. यावेळी सुप्रिया सुळे यांनी हे वक्तव्य केलं आहे. ही वैचारिक लढाई आहे की, वैयक्तिक माझ्यासाठी नाही. पण, ज्या गलिच्छ पद्धतीने आज



राजकारण चाललं आहे, त्या घाणेरड्या मानसिकतेच्या विरोधात लढाई आहे, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, मी पक्षाकडे फक्त एक लोकसभेचं तिकीट मागितलं, यांना ते तिकीट कधीच नको होतं. तेव्हा जर साहेब म्हणाले अरे तू लढतोस का, तर संध्याकाळी घरी येऊन तोच नेता म्हणायचा, साहेब माझं चुकलं का? मला लोकसभेला का पाठवता? कधीही आजपर्यंत त्यांनी लोकसभेचं तिकीट किंवा मला इच्छा आहे, हे सांगितलं नव्हतं. सांगितलं असतं ना, अरे मांगा होता, तो दिल खोलके तुमको देते. जे प्रेमाने घेण्यात जी मजा आहे ना, ती ओरबाडून घेण्यात मजा नाही. पण ही लढाई वेगळी आहे.

**इतकं रडून झालंय, आता अश्रूही येत नाही**

**आधी मी एवढी घट्ट नव्हते, पण दहा महिन्यात झाली आहे. एवढंस जरी बोललं ना तरी माझ्या डोळ्यात पाणी यायचं, पण आता इतकं रडून झालं की, आता डोळ्यातून अश्रूही येत नाही आणि कुणासाठी रडायचं तुम्हाला जर कुटुंबाची, पक्षाची, महाराष्ट्राची जाणीव नसेल तर कशासाठी रडायचं, असा उद्विग्न सवालही सुप्रिया सुळेंनी विचारला आहे.**

### लोकशाहीसाठी लढाई जिंकायची

**पुणे :** ज्यांनी महापुरुषांचा अपमान केला, त्या लोकांना जनतेकडे मते मागण्याचा अधिकार नाही. अशा शक्तींना या निवडणुकीत पराभूत करायचे आहे. यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने कंबर कसून काम करावे, असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केले. पटोले म्हणाले, मोदी सरकार कुंभकर्णाप्रमाणे झोपी गेले आहे. खोट्या आश्वासनांना व्यापारी वैतागले. जीएसटीमध्ये वारंवार बदल केले जात आहेत. व्यापाऱ्यांची छळवणूक होत आहे. आम्ही सत्तेत आल्यावर व्यापाऱ्यांना जीएसटीमध्ये सूट देऊ, असे आश्वासन पटोले यांनी दिले.

# शिर्डीचा उमेदवार सूर्याजी पिसाळाची अवलाद

## अंबादास दानवेंची लोखंडेंवर जहरी टीका

। नेवासा । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र हा निष्ठावंतांचा आहे. महाराष्ट्र खंडोबा खोपडे आणि सूर्याजी पिसाळासारख्या गद्दारांचा नाही. शिंदे गटाचा शिर्डीचा उमेदवार सूर्याजी पिसाळाची अवलाद आहे, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी केली. शिर्डी लोकसभेचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारार्थ अंबादास दानवे यांनी प्रचारसभा घेतली. नेवासा तालुक्यातील सोनई येथे मविआची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते.



यावेळी माजी मंत्री आमदार शंकरराव गडाख, आमदार सुनील शिंदे, आमदार नितीन देशमुख यांची उपस्थित होते. अंबादास दानवेंनी यावेळी बोलताना भाजपवर चौफेर टीका केली. अंबादास दानवे म्हणाले, मशाल विशाल विजय घेऊनच पुढे जाणार आहे. उध्दव ठाकरेंवर टीका करण्यासाठी प्रधानमंत्र्यांना एव्हढ्या सभा घ्याव्या लागतात. हेच आपले यश आहे. देशभरात भाजपच्या जागा कमी होणार आहेत. मात्र, ४०० पार हा माईंड गेम आहे. देशात इंडिया आघाडीचे सरकार येणार आहे. पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, कांदा निर्यातीला परवानगी दिली. मात्र, त्यावर अबकारी कर लावला. पळ म्हणायचे आणि पाय बांधून ठेवायचे, अशी सरकारची कामगिरी आहे. अभिजित पाटील मविआच्या सभेत असताना त्याच्या कारखान्यावर कारवाई करण्यात आली. दुसऱ्या दिवशी त्याने फडणवीसांची भेट घेतली. तिसऱ्या दिवशी भाजपात प्रवेश केला आणि त्याच कारखान्यावर सभा झाली. हे भाजपच्या बापाचे राज्य आहे का? असा सवालही दानवे यांनी केला.

# नसीम खान यांची नाराजी दूर

## वर्षा गायकवाड यांचे बळ वाढणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

उत्तर मध्य मुंबई मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यामुळे काँग्रेसचे नेते नसीम खान गेल्या अनेक दिवासंपापासून नाराज होते. त्यांच्या या नाराजीनंतर काँग्रेसची मोठी अडचण झाली होती. त्यांची मनधरणी करण्यासाठी काँग्रेसकडून हरतऱ्हेने प्रयत्न केले जात होते. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीदेखील त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, आता त्यांची नाराजी दूर झाल्याचे सांगण्यात येत असून, यावर महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नसीम खान यांची नाराजी आता दूर झाली आहे. आम्ही बहुसंख्य आणि



अल्पसंख्याक यांना सोबत घेऊनच पुढे जात आहोत, असे चेन्नीथला म्हणाले. त्यांनी इतर अनेक मुद्यांवर यावेळी भाष्य केले.

दरम्यान, नाराजी दूर झाल्यानंतर काँग्रेसचे नेते नसीम खान यांनी प्रचारसमितीचा दिलेला राजीनामा मागे घेतला आहे.

### कोल्हेंचे आढळरावांना आव्हान

**शिरूर :** शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर निशाणा साधताना आढळरावांनी संसदेत स्वतःच्या कंपनीच्या फायद्यासाठी संरक्षण खात्याविषयीच प्रश्न विचारले होते, असा आरोप केला होता. यानंतर आता कोल्हे यांनी थेट पुरावे सादर करत आढळरावांना कोंडीत पकडत, ‘हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी हैं’, असं ठणकावून सांगितलं आहे. ओतूरच्या सभेत डॉ. कोल्हे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार आढळरावांना लक्ष्य केले.

# पुण्यासह १५७ मतदान केंद्र संवेदनशील

। पुणे । प्रतिनिधी ।

राज्याचं लक्ष लागलेल्या पवार कुटुंबातील हायव्होल्टेज लढत असलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी तिसऱ्या टप्प्यात मतदान होत आहे. या मतदारसंघातील मतदानाची तयारी प्रशासकीय स्तरावर पूर्ण झाली असून मंगळवारी येथे मतदान आहे. त्याच पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून कडक बंदोबस्त तैनात आहे. मात्र, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नी या मतदारसंघातून निवडणूक लढवत असल्याने विशेष खबरदारी घेण्याची मागणी येथील महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे

## सुप्रिया सुळेंचं निवडणूक आयोगाला पत्र

यांनी केली आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघातील अनेक मतदान केंद्रं संवेदनशील असून त्या मतदान केंद्रांवर गैरप्रकार होऊ शकतो. त्यामुळे अशा मतदान केंद्रांवर खबरदारीचे उपाय योजण्यात यावेत, अशी मागणी सुप्रिया सुळेंकडून निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. या संवेदनशील बुथवर काही गैरप्रकार घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील असंही त्यांनी या तक्रारीमध्ये नमूद केलं आहे. सुप्रिया सुळेंकडून इ-मेलच्या मार्फत निवडणूक आयोगाकडे ही तक्रार करण्यात आली आहे. विशेष म्हणजे बारामतीमधील जी मतदान केंद्रं संवेदनशील असल्याचा दावा करण्यात आलाय, त्या मतदान केंद्रांचे क्रमांकही निवडणूक आयोगाला देण्यात आले आहेत. यात बारामती शहर- १२, बारामती ग्रामीण- ४७, दौंड- ३३, पुरंदर- ३१, भोर- ३१, खडकवासला- ३ ही मतदान केंद्र संवेदनशील असल्याने येथे अनुचित प्रकार घडू शकतो. त्यामुळे, तब्बल १५७ मतदान केंद्रांवर विशेष लक्ष देण्याची व खबरदारीचा उपाय म्हणून काम करण्याची मागणी सुप्रिया सुळेंनी केली आहे.

### राज ठाकरेंचे हात दगडाखाली

**पुणे :** मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भूमिका आजपर्यंत कधीच स्थिर राहिली नाही. आताही त्यांनी भाजपला पाठिंबा दिला आहे, याचा अर्थ त्यांचे हात कुठेतरी दगडाखाली अडकले आहेत, अशी शंका येते, अशी टिप्पणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी रविवारी पत्रकार परिषदेत केली. राज ठाकरे यांनी नारायण राणे यांच्या प्रचारार्थ कोकणात सभा घेतली, त्यावर विचारले असता वडेट्टीवार म्हणाले, खरेतर राज ठाकरे अशा जुमलेबाजांबरोबर राहणारे नाहीत. परंतु त्यांचे हात कुठेतरी दगडाखाली अडकले असावेत.

# सह्याद्रीच्या पर्वत रांगेत उभारलं बुथ

## २७ मतदारांसाठी माळरानावर मतपेट्या

। सातारा । प्रतिनिधी ।

भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश असून सध्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. लोकशाहीच्या या उत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावं, यासाठी निवडणूक आयोग मतदार जागृती करतो. तसेच, मतदारांपर्यंत पोहोचण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. यंदा प्रथमच ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या वृद्धांसाठी निवडणूक अधिकारी घरी जाऊन मतदान घेणार आहेत. त्यामुळे, मतदार व प्रशासन दोघांमध्येही वेगळाच उत्साह असल्याचे




दिसून येत आहे. महाराष्ट्रातील तिसऱ्या टप्प्यातील मतदान मंगळवारी होत आहे. त्यात अशी काही उदाहरणे असतात, जी आपणापर्यंत पोहोचू शकत नाहीत. आपले लक्ष फक्त शहरी भागांकडे राहते. मात्र, अशी काही खेडी असतात, दुर्गम भाग असतात, की त्या ठिकाणी पराकाष्टा करुन बुथ उभी करावी लागतात. सातारामधील मतदारसंघातही असेच एक बुथ आहे. जिथे पोहोचण्यासठी प्रशासनाने मोठी कसरत केली आहे.

**खिरखिंडी गावात पोहोचल्या मतपेट्या**

सुमारे पाऊण तासाचा हा बोटीचा प्रवास करुन बोटीतून उतरून पुन्हा खिरखिंडी या गावापर्यंतचा अतिशय भयावहक प्रवास अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार केला. नदीतून प्रवास करताना बोट हवेने हुलकावन्या देत होती. अनेक कर्मचारी आजपर्यंत कधीच यातील बोटीत बसले नव्हते. त्यानंतरचा हा असा दगड धोंड्यातला खडतर प्रवास करुन ते मार्गक्रमण करत राहिले. कारण आपणाला खऱ्या अर्थाने मतदारांना मतदारांचा हक्क बजावून घ्यायचा होता. अखेर, सुमारे एक तासाच्या पायपीटीनंतर दगड धोंड्यातील प्रवासानंतर खिरखिंडी गावात पोहोचले. यानंतर मतदानाचा हक्क किती महत्त्वाचा आहे, हे अधिकाऱ्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे, येथील मतदारांनी १०० टक्के मतदानाचा हक्क बजावत आपले कर्तव्य निभावले पाहिजे.

**केवळ २७ मतदारांसाठी कसरत**

अवघे २७ मतदान असलेले हे गाव. विशेष म्हणजे केवळ २७ मतदानासाठी हा सगळा खटाटोप होता. गावातील मतदारांना विचारले, तुमच्या समस्या काय आहेत, जिथे लाईट नाही, पाणी नाही, रस्ता नाही अशा लोकांना उमेदवार तरी कसा असेल माहित असेल का? चक्क उमेदवारही या लोकांना माहीत नव्हता, परंतु त्यांनी सांगितले आम्ही मतदानाचा हक्क बजावणारच. त्यामुळे, साहजिकच प्रशासनाने जी मेहनत घेतली, जे कष्ट घेतले, जी यंत्रणा कामाला लावली ती सार्थकी ठरेल, असेच म्हणता येईल.

## वे|ध|क

# मतदारांच्या मदतीला युवा, सखी कर्मचारी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी निवडणूक यंत्रणेकडून वेवेगळ्या क्लृप्त्या वापरल्या जात आहेत. यासाठी रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे वेगवेगळ्या कल्पना आखत आहेत. त्यासाठी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील महिला, युवा, अपंग व आदर्श मतदान केंद्रांची निवड करुन तेथील मतदान केंद्रांवर फक्त युवक व फक्त महिला सखी कर्मचारी नियुक्त करण्याचे ठरविले आहे. याचाच एक भाग म्हणून रोहा तालुक्यातील नागोठण्यातील एका मतदान केंद्रावर युवा कर्मचारी व नागोठणे विभागातील दोन व कोलाड येथील एक मतदान केंद्रावर महिला सखी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

लोकसभेच्या पेण या विधानसभा मतदार संघातील नागोठणे जिल्हा परिषद मतदारसंघातर्गत मतदान केंद्र क्र. २८२ पिगोंडे (आंबेघर), कोलाड येथील मतदान केंद्र क्र. ३५८ येथील मतदान केंद्रांवर पोलिस शिपाई, मतदान कर्मचारी ते अधिकारी हे केवळ महिला सखी कर्मचारी नियुक्त करण्यात आल्या आहेत. तर नागोठण्यातील राजिप मराठी शाळा (कन्या शाळा) नवीन इमारतीमधील दक्षिणेकडील खोली क्र. ४ मध्ये युवा संचलित मतदान केंद्र क्र. २८० या ठिकाणी मतदानाच्या दिवशी केवळ युवा कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे लोकसभेच्या या निवडणुकीत जास्तीत जास्त महिला, युवा व इतर सर्व मतदारांनी मतदानाचा आपला पवित्र हक्क बजवावा, असे आवाहन पेणचे प्रांताधिकारी तथा जिल्ह्याचे सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रवीण पवार, रोहाचे तहसीलदार व तालुका निवडणूक अधिकारी डॉ. किशोर देशमुख व तालुका पुरवठा अधिकारी व तालुका सहाय्यक निवडणूक अधिकारी उज्वला अंधेरे-भोईर यांनी केले आहे.

# निवडणूक कर्मचारी नियोजित केंद्रावर रवाना

**। म्हसळा । वार्ताहर ।**

गेले काही दिवस आरोप-प्रत्यारोप करण्याची एकही संधी सत्ताधारी व विरोधकांनी सोडली नाही. प्रचार शिगेला पोहोचला होता. ऐन उन्हाळ्यात निवडणुकांमुळे जिल्ह्यातील वातावरण चांगलेच तापले होते. लोकसभेसाठी मंगळवारी (दि.७) रायगडसाठी मतदान होत आहे. या मतदानासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदार संघात मतदान शांततेत पार पडावे यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त पोलीस अधिकारी त्यामध्ये पोलीस कर्मचारी, होमगार्ड, आर.पी.सी तैनात केले असल्याचे उपविभागीय अधिकारी महेश पाटिल यांनी सांगितले.

रायगड मतदारसंघात१६ लाख ६८ हजार ३७२ मतदार आहेत. यामध्ये पुरुष ८ लाख २० हजार ६०५, महिला ८ लाख ४७ हजार ७६३ आणि तृतीयपंथी ४ आहेत. तर, जिल्ह्यात २ हजार १८५ मतदान केंद्र आहेत. पुरेसा पोलीस बंदोबस्त आराखड्यानुसार त्यांची विविध ठिकाणी तैनाती केली गेली असल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विवेक मुगळीकर यांनी सांगितले. मतदार संघात नियुक्त क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या वाहनांवर बिनतारी संदेश यंत्रणा बसविण्यात आली आहे. संवेदनशील मतदान केंद श्रीवर्धन विधानसभा मतदार संघातील १ मतदान केंद्र ही क्रिटीकल पोलींग स्टेशन म्हणून निश्चित करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त एकही संवेदनशील किंवा अतिसंवेदनशील मतदान केंद्र नाही. या क्रिटीकल पोलींग स्टेशनमध्ये अतिरीक्त पोलीस बंदोबस्त पुरविण्यात आलेला आहे.

# मोदी सरकार ‘गेट आउट’ होणार

## उद्धव ठाकरेंचा नवी मुंबईत घणाघात

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र कोणावर वार करत नाही, जर कोणी वार केला तर वाघ नखे बाहेर काढतो, हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. महाराष्ट्र जिंकण्यासाठी औरंगजेब सत्तावीस वर्षे झुंजला, मात्र त्याला पुन्हा आग्रा पाहता आला नाही. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सध्या देशात असंतोषाचा जनक बनला असून शिवसेनेच्या मशालिमुळे हुकूमशहास्वराचा बुडाला आग लागणार आहे. नरेंद्र मोदी आणि त्यांचे सरकार येथे चार जूननंतर रिटायर नाही तर ‘गेट आउट’ होणार आहेत, असा घणाघात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी (दि.५) नवी मुंबईत केला.

ठाणे लोकसभा मतदारसंघातील शिवसेना महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचारासाठी ऐरोली येथील श्रीराम विद्यालयाच्या भव्य मैदानावर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत बोलताना शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि मिंद्ये गटाची अक्षरशः पिसे सोलली. ठाण्याची शिवसेना आणि शिवसेनेचे ठाणे हे नाते फार जुने आहे. मी



मात्र हे नाते सांगण्यासाठी येथे आलो नाही तर गद्दारांची मस्ती उतरवण्यासाठी या ठिकाणी आलो आहे. तुम्हीही त्यासाठी अलात ना, असा प्रश्न शिवसेना पक्षप्रमुखांनी उपस्थित जनसमुदायाला विचारल्यानंतर जनसमुदायाने गद्दारांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’, असे विधान लोकममान्य टिळकांनी इंग्रज सरकारच्या विरोधात केले होते. त्यावेळी ते असंतोषाचे जनक ठरले होते. आज नरेंद्र मोदी आणि अमित शहा या हुकूम शहांच्या विरोधात महाराष्ट्र असंतोषाचे जनक ठरला आहे. आजच्या सरकारला डोके नाही, त्यांच्याकडे फक्त खोके आहेत. त्यामुळे हे सरकार डोकेबाज नाहीतर धोकेबाज आहे. तुम्ही कितीही जुलूम, दडपशाही करा पण एम.के. मढवी सारखे निष्ठावंत तुरुंगात गेले तरी डगमगणार नाहीत. तुम्ही शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्यासारख्या निष्ठावंतांना ही तुरुंगात टाकले आहे. आता देशात इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर तुमची ही जागा याच तुरुंगात नक्की आहे, असाही इशारा उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.

याप्रसंगी रश्मी ठाकरे, शिवसेना नेते खासदार संजय राऊत, खासदार राजन विचारे, काँग्रेसचे नेते मुझफ्फर हुसेन, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड, माजी आमदार विद्या चव्हाण, शिवसेना सचिव वरून सरदेसाई, ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, जिल्हाप्रमुख द्वारकानाथ भोईर, विठ्ठल मोरे, रंजना शिंत्रे, जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक, आपचे दिनेश ठाकूर, रमाकांत म्हात्रे, पुनम पाटील, संपर्कप्रमुख विद्याधर चव्हाण, उपजिल्हाप्रमुख मनोज हळदणकर, सूर्यकांत मढवी, शहर प्रमुख प्रवीण म्हात्रे, युवा सेना सहसचिव करण मढवी, चेतन नाईक आदी उपस्थित होते.

यावेळी खासदार संजय राऊत यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे खोटे बोलण्याची मशीन आहेत. त्यांनी दहा वर्षात देश फक्त लुटलाच नाही तर बरबाद केला आहे. त्यामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीच्या सभांना राज्यभरात मोठा प्रतिसाद मिळत आहे. लाखो लोक सभांसाठी जमत आहेत. ही गर्दी हे येत्या चार जून रोजी नरेंद्र मोदी यांना रिटायर केल्याशिवाय राहणार नाही. नरेंद्र मोदी हे निराश, हताश आणि हतबल माणूस बनले आहेत. जगात सर्वात मोठा ढोंगी माणूस कोण, असा प्रश्न विचारला तर नरेंद्र मोदींचे नाव पुढे येईल. तुम्ही शिवसेनेचा धनुष्यबाण चोरला, आता तुमचे कमळ महाराष्ट्र राहू देणार नाही. भाजप राजकीय नकाशावरून नष्ट होणार आहे.

आयोध्यामध्ये नरेंद्र मोदी रोड शो करीत आहेत पण त्यांनी हे लक्षात ठेवावे अयोध्येतील राम आमच्या पाठीशी उभा आहे. आजची सभा ही श्रीराम विद्यालयाच्या प्रांगणात होत आहे. हेच आमचे श्रीरामांशी नातं आहे. शिवसेना गुजरातच्या दोन चोरांनी फोडण्याचा प्रयत्न केला तरी शिवसेना संपू शकली नाही. धनुष्यबाण चोरून तुम्ही ज्यांच्या हातात दिलंत त्यांची एक्सपायरी डेट आता संपलेली आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर देशात परिवर्तन होणार आहे. त्यामुळे हुकूमशाहांची तडफड आणि फडफड कायमस्वरूपी थांबणार आहे. ‘झोला लेकर आया था, झोला लकर जाऊंगा’, असे म्हणत मोदींना त्यांच्या इच्छेनुसार हिमालय जावे लागणार आहे, असे फटकारे शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी यावेळी भाजपवाल्यांना लगावले.

# अलिबाग येथे मतदारांमध्ये जनजागृती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, पुणे विभागीय कार्यालयामार्फत स्थानिक जिल्हा प्रशासन, नेहरू युवा केंद्र तसेच प्रिझम सामाजिक विकास संघटनेच्या सहकार्याने अलिबाग येथे मतदार जनजागृती आणि सहभाग कार्यक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी उपजिल्हाधिकारी श्रीमती स्नेहा उबाळे, प्रांताधिकारी मुकेश चव्हाण, नायब तहसिलदार अजित तोलकर आणि अलिबाग येथील राज्य परिवहन महामंडळाचे आगार व्यवस्थापक अजय वनारसे, केंद्रीय संचार ब्युरोचे प्रसिद्धी सहायक पी. कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

अलिबाग हे कोकणातील लोकप्रिय असे पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. मुंबई, पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून या ठिकाणी



### पथनाट्यांना पर्यटकांचा जोरदार प्रतिसाद

पर्यटक विरंगुळ्याचे क्षण घालवण्यासाठी दररोज दाखल होतात. विशेषतः शनिवार, रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशी अलिबाग परिसर हा पर्यटकांच्या गर्दीने फुललेला असतो. या बाबी विचारात घेता पर्यटकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी केंद्रीय संचार ब्युरोमार्फत अलिबाग समुद्रकिनारा आणि अलिबाग बस स्टँड परिसर येथे शनिवारी (दि.४) आणि रविवारी (दि.५) असे दोन दिवस स्वीपसंदर्भात कार्यक्रम राबवण्यात आले. याप्रसंगी स्वयंम सिद्ध सामाजिक विकास संस्थेने सादर केलेल्या पथनाट्यांना पर्यटक आणि मतदार यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

# आदित्य ठाकरेंची सदिच्छा भेट

**। नागोठणे । वार्ताहर ।**

युवा सेना प्रमुख व माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी मुंबई मालाडचे माजी आमदार डी. एन.चौलकर यांच्या मुरुड-जंजिरा येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने ते मुरुड-जंजिरामध्ये आले होते.

युवा अवस्थेत डी.एन. चौलकर मुंबई युवक काँग्रेसचे अध्यक्ष होते. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्यासह तत्कालीन चळवळीत मुंबई बंद हाक त्यांनी एकेकाळी संयुक्तपणे दिली होती. स्व. राजीव गांधी यांच्या पश्चात त्यावेळी सोनिया गांधी यांनी सक्रिय राजकारण न करण्याचा निर्णय केला होता. तेव्हा असंख्य समर्थक मुंबई सोडून बाहेर पडले. डी.एन. चौलकर तेव्हा मुरुड-जंजिरामध्ये परतले. यावेळी त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली.



# रामदास गोवारी अध्यक्षपदी

**। पनवेल । वार्ताहर ।**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत शिवसेनेच्या (उद्धव ठाकरे) पदाधिकाऱ्यांमध्ये काही फेरबदल करण्यात आले आहेत. कामोठे शहर अध्यक्ष पदावर रामदास गोवारी यांची निवड ठाकरे गटाकडून करण्यात आली असून उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार तशा आशयाचे पत्र जिल्हाध्यक्ष शिरीष घरत यांनी गोवारी यांना दिले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाच्या अनुषंगाने महत्वाच्या असलेल्या कामोठे वसाहतीत शिवसेनेला (उद्धव ठाकरे) मानणारा मोठा वर्ग आहे. मूळचे मुंबई येथून कामोठे वसाहतीत स्थलांतरीत झालेल्या या वर्गाला आपल्याकडे खेचण्यासाठी सर्व पक्ष प्रयत्न करत आहेत. त्याच अनुषंगाने सर्व समावेशक आश्वासक असा चेहरा देण्याचा प्रयत्न शिवसेनेने (उद्धव ठाकरे) केल्याचे पाहायला मिळत असून, सेनेशी कायमच एकनिष्ठ राहिलेल्या रामदास गोवारी यांच्या खांद्यावर शहर अध्यक्ष पदाची जवाबदारी देत कामोठे वसाहतीत महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्या पारड्यात जास्तीत जास्त मतदान पाडून घेण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीकडून केला गेल्याची चर्चा सर्वसामान्य सैनिकांमध्ये आहे. दरम्यान, गोवारी यांना सेनेकडून शहर अध्यक्ष पदाची जवाबदारी देण्यात आल्याने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# मविआ प्रचारकांचे जागोजागी स्वागत

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मावळलोकसभामतदारसंघात दिवसागणीक महाविकास आघाडीचे अधिकृत व लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांना वाढता प्रतिसाद मिळत आहे. शिवसेना उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, काँग्रेस, समाजवादी पार्टी, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, सीपीआय(एम), आरपीआय (ए), स्वाभिमानी रिपब्लिकन युथ पार्टी, स्वराज इंडिया असे महाविकास आघाडीमधील घटक पक्षांचे नेते पनवेल, उरण आणि कर्जत मतदारसंघ पिंजून काढत आहेत. प्रत्येक ठिकाणी म हाविकास आघाडीच्या प्रचारकांचे जागोजागी उत्स्फूर्त स्वागत होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

कोकण शिक्षक मतदार संघाचे महाराष्ट्राच्या विधान परिषदेत प्रतिनिधित्व केलेले शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी येथील प्रचाराचे लगाम आपल्या हाती घेतले आहेत. त्यांच्या सम वेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष शिरीष घरत, जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र



पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष माजी नगरसेवक सतीश पाटील, काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माझी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे अशी तगडी फौज शहरी भागापासून ते अगदी मायक्रो इंटिरियरमध्ये जात संजोग वाघेरे-पाटील यांची निशाणी असणारी मशाल घरोघरी पोहोचवत आहेत.

विकास कामांच्या पातळीवर चर्चा करायचे म्हटल्यास झालेल्या प्रकल्पांपेक्षा न झालेल्या आणि प्रलंबित असणाऱ्या प्रकल्पांची यादी फार मोठी आहे. सुनियोजित विकास करत असताना लोकांच्या डोक्यावर प्रकल्प लादण्याचे अघोरी काम केंद्र सरकारकडून होत आहे. शेतकरी, स्थानिक भूधारक यांच्याशी कुठलाही स्वरूपाची चर्चा न करता पुनर्वसनाचे बाबतीत त्यांना जराही विचारात घेतलेले नाही. वातानुकलीत प्रशस्त कार्यालयांच्यात बसून नकाशावर रेषा मारून विकास साधत नाही. त्यासाठी मैदानात उतरून स्थानिक प्रकल्पग्रस्तांशी चर्चा करावी लागते, त्यांची मते-सूचना ग्राह्य धरत सुनियोजित विकास करावा लागतो. परंतु केंद्र सरकारने या साऱ्यांना फाट्यावर मारत दडपशाही अवलंबली आहे. मतदारसंघाचे दिल्लीत प्रतिनिधित्व करणारे खासदार महोदयांनी या साऱ्या गोष्टींकडे पाहणे अपेक्षित असते. अनेक पत्र, विनंत्या यांना केराची टोपली दाखवणाऱ्या विद्यमान खासदारांच्या बाबत सामान्य जनतेत असंतोष खतखद असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

# प्रकल्पग्रस्तांचे स्वप्न पुर्ण करणारः संजोग वाघेरे

**। उरण । वार्ताहर ।**

मावळच्या विद्यमान खासदारांनी तालुक्यातील जनतेला, प्रकल्पग्रस्तांना आश्वासनापलीकडे काहीच दिले नाही. त्यामुळे होऊ घातलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांना उरणची जनता त्यांची जागा दाखविणार आहे. त्या जनतेच्या, प्रकल्पग्रस्तांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता त्यांचे अधुरे राहिलेलं स्वप्न हे नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटीलांचे नाव देऊन मी



त्यांचा सेवक म्हणून पुर्ण करणार असल्याचा विश्वास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे -पाटील यांनी व्यक्त केला आहे.

मावळ मतदारसंघाचे शिवसेना (उबाठा), काँग्रेस, शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस महाआघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या उरण तालुक्यातील गाव प्रचाराचे आयोजन सोमवारी (दि.६) जासई येथील हुतात्म्यांना अभिवादन करून करण्यात आले. यावेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.

महाआघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ उरण तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या रँलीत शिवसेनेचे मा.आमदार तथा जिल्हाप्रमुख मनोहर भोईर, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, आर. सी. घरत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस संतोष घरत, भावना घाणेकर, शेकापचे नेते प्रितम म्हात्रे, दिनेश पाटील, भुषण पाटील, हेमलता पाटील, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, काका पाटील, महिला प्रमुख सीमाताई घरत, माजी सभापती नरेश घरत, सरपंच संतोष घरत, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, शेकापचे तालुका चिटणीस विकास नाईक, शिवसेनेचे तालुका संपर्क प्रमुख दिपक भोईर, आदींसह महाआघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

# संजोग वाघेरेंची बारणेंवर खोचक टिका

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

माझा लोकसभेची संबंध काय, माझा याच्याशी संबंध नाही, मी आम दार आहे. माझा याच्याशी संबंध नाही, मी नगरसेवक आहे. माझ्यापुढे बसत नाही. हे व्यक्तिवाद करणारी मंडळी लोकप्रतिनिधी असू शकत नाही. या ठिकाणी दुर्दैवच आहे की या दोन्ही म णसांना निवडून देताना अनेकांनी पैसे घेऊन मते दिली. माझी आपल्याला विनंती आहे, डोळसपणाने मतदान



करा. लोकसभेची निवडणूक होऊ द्या. नंतर आपण महापालिकेचा विचार करू. पासपोर्ट कार्यालय पनवेलला येण्याऐवजी अलिबाग येथे कधी केलं त्याचा आपल्या आमदार खासदारांना पत्ताही लागला नाही. पनवेल आणि कळंबोलीसाठी आरोग्य सुविधा एमजीएम येथे आहे, पण खारघरला मात्र ती सुविधा नाही. महानगरपालिकेच्या क्षेत्रातल्या घराच्या मालमत्ता कराबाबतीत त्यांनी निर्णय घेतला नाही. खासदार बारणे यांना मुलाला जेएनपीटीच्या वाहन तळाचा ठेका मिळवण्यासाठी वेळ मिळाला,परंतु नागरिकांचे कामे करण्यास वेळ मिळाला नाही, अशा खोचक शब्दात टीका केली.

# शरदचंद्र पवार गटाची कार्यकारणी जाहीर

**। पनवेल । वार्ताहर ।**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाची पनवेल विधानसभा कार्यकारणी अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांनी घोषित केली. डॉ. मुनीर तांबोळी यांची पनवेल विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती झाल्यापासून पनवेल विधानसभा हद्दीत अनेक तरुणांचा, महिलांचा पक्षात प्रवेश झाला. यावेळी पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष सतीश पाटील बोलताना म्हणाले की, संघटना जोमाने वाढत आहे. डॉ. तांबोळी यांनी प्रवेश केल्यापासून पनवेल भागात पक्षाला चांगली ताकत मिळाली आहे. अनेक महिलांनी पक्षात प्रवेश केला आहे. कामोठे येथे लवकरच पतपेढी सुरू करण्याचा मानस आहे. पुढील काळात अनेक उपक्रम राबविले जाणार असून पक्ष संघटना मजबूत करण्याचे काम जोरात सुरू आहे, असेही ते म्हणाले.

# उरण तालुक्यात संजोग वाघेरेंना मोठा प्रतिसाद

### उन्हाची तमा न बाळगता महिलाही एकवटल्या

**। उरण । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांनी सोमवारी (दि.६) उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील गावागावात प्रचार दौऱ्याला सुरुवात केली. या गावभेटी प्रचारदौऱ्यात त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. तालुक्यातील गावभेटी दौऱ्यात उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी आपल्या महाविकास आघाडीच्या असंख्य कार्यकर्त्यांबरोबर जासई येथील शेतकरी लढ्यातील हुतात्म्यांना अभिवादन करीत प्रचाराला प्रारंभ केला. यावेळी प्रत्येक गावातील नाक्या नाक्यावर महिला कार्यकर्त्यांनी त्यांचे औक्षण



केले. प्रचार दौऱ्यात उन्हाची तमा न बाळगता, तरुणाई बरोबर महिलाही एकवटल्या होत्या.

तालुक्यातील प्रचारात गाव भेटीमध्ये ‘संजोग वाघेरे पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है’ अशा घोषणांनी गावागावातील वातावरण दणाणून गेले होते. गावागावात त्यांच्या प्रचार रॅलीला नागरिकांचा भरभरून पाठिंबा मिळत होता. नागरिकांकडून त्यांचे स्वागत केले जात होते. आणि विजयासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात येत होत्या.

हुकूमशाही मोदींविरोधात देशातील जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. ही मोदींविरोधात लोकशाहीची लढाई आहे. हुकूमशाही थांबवण्यासाठी महाविकास आघाडीला ही लढाई जिंकलीच पाहिजे, असे आवाहन नेते मंडळी नागरिकांना आपल्या भाषणातून करत होते. मोदी सरकारने आजपर्यंत देशातील जनतेची महागाई, बेरोजगारी, शेतीमालाचा हमीभाव अशा विविध प्रश्नी फसवणूक केली आहे. असंख्य कार्यकर्त्यांच्या आणि नागरिकांच्या प्रचारातील प्रतिसादामुळे मावळ मतदार संघात विजयाची माळ उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्याच गळ्यात पडणार असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी महाविकास आघाडीच्या प्रचार दौऱ्यात उमेदवार संजोग वाघेरे यांच्या समवेत शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सरचिटणीस प्रशांत पाटील, महिला प्रदेश सरचिटणीस भावना घाणेकर, भूषण पाटील, शिवसेना जिल्हा उपप्रमुख नरेश रहाळकर, काँग्रेसचे उपजिल्हाप्रमुख मिलिंद पाडगावकर, आर.सी. घरत, तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, माजी सभापती नरेश घरत, गणेश म्हात्रे, काँग्रेस अध्यक्षा रेखा घरत, शेकापच्या सीमा घरत, महादेव बंडा, विकास नाईक, काका पाटील, संतोष घरत, भास्कर मोकल, प्रफुल्ल खारपाटील, रवी घरत, सुरेश पाटील, गणेश म्हात्रे, तसेच तालुकास्तरावरील सर्व पक्षाचे पदाधिकारी व महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# वृध्द व अपंग मतदारांचे गृहमतदान



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

महाड विधानसभा मतदार संघामध्ये वृध्द आणि अपंग मतदारांचे १२‘ड’ हा अर्ज भरून मतदार नोंदणी करीत गृहमतदान करण्याची यंदा नव्याने संकल्पना निवडणूक आयोगामार्फत राबविण्यात येत आहे. संपूर्ण महाड विधानसभा मतदार संघामध्ये या मतदानाचा पहिल्यांदाच प्रयत्न झाला असल्याची माहिती महाड उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयातून देण्यात आली.

महाड विधानसभा मतदार संघामध्ये वृध्द मतदार २९४ तर अपंग मतदार ५१ असल्याची नोंद करण्यात आली. या मतदारांकडून गृह मतदानासाठी अर्ज भरून घेण्यात आले आहेत. पोलादपूर तालुक्यामध्ये या नव्या पध्दतीचे मतदान वृध्द नागरिकांच्या घरी जाऊन गुप्तमतदान पध्दतीने होण्यासाठी तहसिलदार कपिल घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली टीम कार्यरत राहिली. पोलादपूर तालुक्यातील ढवळे खोपड ३६४ आणि करंजे ३६५ मतदान केंद्रातील प्रत्येकी एक अशा वृध्द महिलांच्या घरी जाऊन निवडणूक यंत्रणेकडून गृह मतदान करून घेण्यात आले. मतमोजणीवेळी या गृह मतदानाची आकडेवारी संबंधित उमेदवारांच्या आकडेवारीमध्ये समाविष्ठ करण्यात येणार आहेत.

# एकच निर्धार, हद्दपार

रायगडसह अकरा मतदारसंघांमध्ये मंगळवारी मतदान होत आहे. राज्यातील पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये भाजप आणि मोदीविरोधात स्पष्ट लाट दिसून आली. तीच या तिसऱ्या टप्प्यातही दिसेल यात शंका नाही. रायगडची लढाई अनेक अर्थांनी महत्वाची आहे. दरवेळी कोणाचा तरी आधार घ्यायचा आणि विजय मिळवू पाहायचा असा लबाडपणा येथील विद्यमान खासदारांनी केला आहे. यंदा त्यांनी नरेंद्र मोदी आणि भाजपचा पदर पकडला आहे. पण जनता आता मागच्या अनुभवाने शहाणी झाली आहे. तिने यांना धडा शिकवण्याचा निर्धार केला आहे हे प्रचाराच्या काळात स्पष्टपणे दिसले. आज तो निर्धार पूर्ण करण्याची वेळ आली आहे. इतरत्र मतदानाचा टक्का घटला असला तरी येथे मतदार हिरीरीने बाहेर पडतील हे निःसंशय. उद्धव ठाकरे यांची सेना, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्या जोडीने शेतकरी कामगार पक्षाने येथे एकदिलाने काम केले आहे. त्याचे सुपरिणाम नक्की दिसतील. दुसरीकडे विद्यमान खासदार आणि त्यांचा पक्ष या लढतीत एकाकी पडल्याचे सर्वांनीच पाहिले. दक्षिण कोकणात नारायण राणे जिंकण्याची शक्यता किती हा वादाचा मुद्दा आहे. पण त्यांनी प्रचाराचा धडाका उडवून दिला. अमित शाहपासून अनेक जण त्यांच्या प्रचाराला आले. रायगडात मात्र अपवादानेच मोठ्या नेत्यांनी हजेरी लावली. अजित पवार यांचे तर जवळपास बारामती एके बारामती असेच चालू होते. इतर नेतेही नावापुरते येऊन गेले. ही जागा हातातून गेली आहे हे बहुदा सर्वांनाच कळून चुकले असावे. म्हणूनच प्रत्यक्ष मतदानाआधी, प्रचारातच, त्यांनी आपला पराभव मान्य केल्यासारखे दिसत होते. त्या पार्श्वभूमीवर मतदान ही काहीशी औपचारिकताच आहे. मात्र म्हणून महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी गाफील राहून चालणार नाही. त्यांना आजच्या दिवशी अधिक काम करावे लागेल. तरच मोठ्या मताधिक्याने त्यांचा विजय होऊ शकेल.

### रायगडची जनता भुलणार नाही

यंदाच्या निवडणुकीत नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा लोकांचा कौल मागत आहेत. उमेदवार कोणीही असो, मत मोदीला देतो आहे असे समजून द्या असे आवाहन ते करीत आहेत. त्यासाठी मोदी की गॅरंटी म्हणून वाटेल त्या गोष्टी सांगत आहेत. पण रायगडची जनता हुशार आहे. आजतागायत तिने अनेक भल्याभल्यांना पाणी पाजले आहे. अमुक नेत्याची किंवा पक्षाची लाट आहे म्हणून तिच्यात ती कधीच वाहून जात नाही. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर देशभरात सहानुभूतीची लाट उसळली. राजीव गांधी यांना ४१४ जागा मिळाल्या. पण तेव्हादेखील रायगडच्या जनतेने या लाटेच्या विरोधात जाऊन शेकापच्या दि.बा. पाटील यांना विजयी केले होते. राजीव गांधींचा तो विक्रम मोडण्याची मोदींची इच्छा आहे. म्हणून त्यांनी चारसौ पारचा नारा दिला. पण चारशे तर सोडाच दोन-अडीचशे तरी जागा मिळतील का अशी शंका आता व्यक्त होते आहे. दोन फेऱ्यांनंतरच भाजपवाले धापा टाकू लागले आहेत. म्हणूनच मोदींच्या महाराष्ट्रात सारख्या येरझाऱ्या चालू असून आतापर्यंत बारा सभा झाल्या. अजूनही होणार आहेत. पण मतदारांचा निर्णय झालेला आहे. अशा कितीही सभा झाल्या तरी तो बदलणारा नाही. एरवीही कोणत्या लाटेच्या वातावरणाला रायगडवासिय बळी पडलेले नाहीत. यंदा तर ती कथित लाट निर्माणही झालेली नाही. उर्वरित महाराष्ट्रवासीय या लाटवाल्यांचा आणि खोट्या गॅरंटीवाल्यांना दणकून हरवणार असाच माहौल आहे. शिवसेना फुटल्यानंतरही उद्धव ठाकरे यांनी अत्यंत निर्धाराने संकटाचा मुकाबला केला आहे. त्यांचे प्रतिनिधी अनंत गिते यांचे काम जिल्ह्यातील जनतेला परिचित आहे. आज त्यांना मत म्हणजे मोदींना रोखणाऱ्यांना मत असे स्पष्ट समीकरण आहे. यापूर्वी ऐन मोदी लाटेतही रायगडची जनता भुलली नव्हती. आपल्या कर्तव्याला चुकली नव्हती. यंदा तर तोही सवाल येत नाही.

### लोकशाही धोक्यात

२०२४ ची निवडणूक ही नेहमीसारखी नाही. या देशात लोकशाही टिकणार का याचा फैसला यातून होणार आहे. गेली दहा वर्षे या देशाने वाढत्या क्रमाने हुकुमशाही पाहिली आहे. मोदी या एकाच नेत्याभोवती सरकार फिरते आहे. मोदींच्या मनात आले म्हणून या देशात एका रात्रीत नोटबंदी लागू झाली. इतके करूनही ना काळा पैसा बाहेर आला ना भ्रष्टाचार थांबला. उलट, निवडणूक रोख्यांच्या नावाखाली भाजपने आठ हजार कोटी रुपये जमा केले. आधी ज्यांना इडीची धमकी देण्यात आली त्याच कंपन्यांनी हे पैसे दिले. तरीही त्याचे निर्लज्ज समर्थन भाजपवाले करीत आहेत. यंदाच्या प्रचारात तर मोदी हे सतत निव्वळ खोटे बोलत आहेत. इतका खोटारडा पंतप्रधान कधीच झाला नाही. काँग्रेस तुमचे मंगळसूत्र काढून घेणार आहे असा अत्यंत वाह्यात आरोप ते करीत आहेत. महाराष्ट्रात येऊन हेच मोदी शरद पवारांना भटकता अतृप्त आत्मा म्हणाले. रायगडच्या विद्यमान खासदारांची प्रगती याच पवारांच्या कृपेने झाली. पण त्यांना वा त्यांच्यासारख्या इतर अनेक नेत्यांना आपल्या एकेकाळच्या नेत्याला अशी नावे ठेवल्याबद्दल काहीही वाटले नाही. त्यांनी याबद्दल किमान खेद व्यक्त करायला हवा होता. पण सत्तेसाठी लाचार असलेले लोक अशी हिंमत दाखवू शकत नसतात. असल्या लोकांना नेता म्हणणे रायगडवासियांना शक्य होणारे नाही. मोदी व शाह यांच्या भाजपने महाराष्ट्रातले दोन पक्ष फोडले. त्यापैकी बहुसंख्य नेते इडीच्या कारवाईच्या भीतीने तिकडे गेले. आता या फुटीरांकरवी उद्धव ठाकरे व शरद पवारांवर कोणत्याही थराला जाऊन आरोप करणे चालू आहे. किंबहुना, गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्राचे राजकारण म्हणजे या आरोपांची गटारगंगाच झाली आहे. बेकारी, महागाई किंवा खऱ्या विकासाचे प्रश्न त्यात बाजूला पडले आहेत. लोकांचे लक्ष त्याकडे जाऊ नये आणि त्यांनी केवळ हिंदू विरुध्द मुस्लिम असल्या वादात अडकून राहावे अशीच भाजपची इच्छा आहे. या राजकारणाचा पराभव करण्याची वेळ आली आहे.

विचार

# रेवण्णांच्या निमित्ताने नवी शोषणगाथा

**व्हाईट कॉलर पिता-पुत्र, असहाय्य मुली आणि अनेक अश्लील व्हिडिओ असलेला पेन ड्राईव्ह... देशभरात खळबळ माजवणाऱ्या या कथेचे खलनायक आहेत माजी पंतप्रधान देवेगौडा यांचे चिरंजीव एच. डी. रेवण्णा आणि नातू प्रज्वल रेवण्णा. असंख्य मुलींचे लैंगिक शोषण करण्याबरोबरच अश्लील व्हिडीओ बनवून धमकावल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या निमित्ताने अबलांच्या लैंगिक शोषणाची दुष्प्रवृत्ती नव्याने समोर आली आहे.**



**श्रीनिवास राव**

माजी पंतप्रधान एच. डी. देवेगोडा यांचे कुटुंब वादाच्या मोठ्याच भोवऱ्यात सापडले आहे. देवेगौडा यांचा मुलगा आणि नातू लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी आहेत. कर्नाटकमध्ये लोकसभेच्या निवडणुकीचे दोन टप्पे पूर्ण झाले असताना हे प्रकरण उघडकीस आले. हे प्रकरण 'हाय प्रोफाइल' आहे. लैंगिक शोषणाच्या बळी ठरलेल्या मुलींची संख्या अद्याप स्पष्ट झालेली नाही; परंतु सुमारे तीन हजार अश्लील व्हिडिओ समोर आले आहेत. अशा स्थितीत ही बाब समोर येताच राज्य सरकारने 'एसआयटी' स्थापन करून तपास सुरू केला. हा लैंगिक घोटाळा प्रकाशझोतात येताच प्रकरणाचा मुख्य सूत्रधार प्रज्वल रेवन्ना हे देश सोडून पळून गेले आहेत. सध्या ते जर्मनीत असल्याचे सांगण्यात आले आहे. या निवडणुकीच्या मोसमात हा घृणास्पद प्रकार कसा उघडकीस आला असा प्रश्न आता पडला आहे. 'एसआयटी' प्रज्वल रेवण्णा आणि त्याच्या वडिलांची चौकशी करेल, गुन्ह्याचे आरोप आणि कलमे जाणून घेईल. दुसऱ्या टप्प्यातील मतदानाच्या काही दिवस आधी म्हणजे २० एप्रिल रोजी हा प्रकार उघडकीस आला. देशातील इतर अनेक भागांसोबतच कर्नाटकमध्ये २६ एप्रिल रोजी लोकसभेच्या १४ जागांसाठी मतदान होणार होते. निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू होता. नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरीही सुरू होत्या; पण त्याच दरम्यान हासनमधून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा घटक पक्ष असलेल्या धर्मनिरपेक्ष जनता दलाचे संस्थापक, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवण्णा यांचे काही आक्षेपार्ह व्हिडिओ व्हॉट्स अपवर फिरू लागले. त्यानंतर काही वेळातच ते संपूर्ण कर्नाटकमध्ये व्हायरल झाले.

दरम्यानच्या काळात दुसऱ्या टप्प्याच्या निवडणुका झाल्या आणि एवढे होऊनही रेवण्णा मत मागत राहिले. मात्र प्रज्वल यांना परिस्थिती उमगली होती. इकडे निवडणुका संपल्या आणि तिकडे रेवण्णा देशाबाहेर जर्मनीला निघून गेले; मात्र त्यांच्या विरोधी पक्षांनी हल्लाबोल सुरू केला होता. दरम्यान, रेवण्णा कुटुंबात काम करणाऱ्या एका पीडित महिलेने एच. डी. रेवण्णा आणि प्रज्वल रेवण्णा यांच्या विरोधात फिर्याद दाखल केली. त्यात वडील आणि मुलाच्या गैरकृत्यांशी संबंधित अनेक स्फोटक आणि धक्कादायक गौप्यस्फोट करण्यात आले. कार्तिक गौडा नावाचा माणूस रेवण्णा कुटुंबाचा जुना ड्रायव्हर होता. त्यांनी सुमारे १५ वर्षे रेवण्णा कुटुंबाची वाहने चालवली. हळूहळू रेवण्णासोबतचे त्यांचे संबंध बिघडू लागले. कार्तिक यांनी नोकरी सोडली. त्यांच्या म्हणण्यानुसार रेवण्णा कुटुंबाने त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण केले होते. त्यांनी विरोध केल्यावर प्रज्वलने त्यांना आणि त्यांच्या पत्नीला मारहाणही केली. आपल्यावर झालेल्या या अत्याचाराविरुद्ध त्याला न्याय हवा होता. रेवण्णा कुटुंबाच्या काळ्याकुट्ट कृत्यांची माहिती असल्याने त्याने वेगवेगळ्या मुलींसोबत रेवण्णाच्या अश्लील व्हिडिओंनी भरलेला पेन ड्राइव्ह तयार केला. त्यांनी भाजप नेते देवराज गौडा यांची भेट घेतली. दुसरीकडे, प्रज्वल यांनी एक जून २०२३ रोजी याबाबत न्यायालयात धाव घेतली आणि व्हिडिओच्या मदतीने आपली प्रतिमा खराब केली जात असल्याचे सांगितले. हा पेन ड्राईव्ह भाजप नेत्याला देण्यात आला. यानंतर न्यायालयाने कोणतेही व्हिडिओ किंवा फोटो शेअर करण्यावर बंदी घातली. माध्यमांनाही तसे करण्यास बंदी घालण्यात आली होती.

न्यायालयाच्या या आदेशाला कार्तिक यांनाही उत्तर द्यायचे असल्याने त्यांनी पुन्हा देवराज गौडा यांची भेट घेतली आणि त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून पेन ड्राईव्ह परत घेतला. त्यात प्रज्वल यांचे असंख्य मुली आणि महिलांसोबतचे अश्लील व्हिडिओ होते. कार्तिक यांच्या म्हणण्यानुसार, देवराज यांनी या व्हिडिओंचे काय केले, हे त्यांना माहीत नाही. महिनाभरानंतर त्याने देवराज यांना विचारले असता त्यांनी काहीही सांगण्यास नकार दिला. कार्तिक यांनी त्यांच्याकडून व्हिडिओची प्रत परत मागितली. देवराज यांनी हे न्यायालयात सादर करणार असल्याचे सांगितले. देवराज वकील असण्यासोबतच भाजपचे आमदारही आहेत. कार्तिक सांगतात की निवडणुकीपूर्वी देवराज यांनी पक्षश्रेष्ठींना पत्र लिहून प्रज्वल रेवण्णा यांना तिकीट न देण्याची मागणी केली होती. या पत्राची प्रतही त्यांनी कार्तिक यांना दिली आणि सांगितले की न्यायालयात न्याय मिळेल. कार्तिक सांगतात, यानंतर देवराज यांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली. दुसरीकडे, या प्रकरणी रेवण्णा यांचे चालक कार्तिक काहीही म्हणत असले तरी त्यांनी पेन ड्राइव्हच्या काही प्रती काँग्रेस नेत्यांनाही दिल्याचे देवराज गौडा यांनी म्हटले आहे. देवराज यांचा हा दावा पूर्णपणे चुकीचा असल्याचे कार्तिक यांचे म्हणणे आहे. अश्लील व्हिडीओने भरलेला पेन ड्राइव्ह त्यांनी देवराज गौडा यांच्याशिवाय कोणालाही दिला नाही. एच. डी. रेवण्णा आणि प्रज्वल रेवण्णा यांच्या गैरकृत्यांचा तपास करण्यासोबतच रेवण्णाचे ते अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर कसे व्हायरल झाले, याचा तपास आता एसआयटी करणार आहे.

रेवण्णा पिता-पुत्रावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत. रेवण्णा कुटुंबात स्वयंपाकी म्हणून काम करणाऱ्या एका महिलेने ही फिर्याद दाखल केली आहे.

ही महिला रेवण्णा यांच्या पत्नी भवानी यांची नातेवाईक आहे. तिने तक्रारीत म्हटले की रेवण्णा कुटुंबात स्वयंपाकी म्हणून काम करायला सुरुवात केल्यानंतर चार महिन्यांनी तिच्यावर शारीरिक अत्याचार सुरू झाले. प्रज्वल स्वयंपाकी महिलेच्या मुलीशी आक्षेपार्ह बोलत असे. २०१९ मध्ये रेवण्णा कुटुंबातील सूरज या तरुणाचे लग्न होते, तेव्हा तिला कामासाठी बोलावले होते; परंतु त्यानंतर संधी मिळायची, तेव्हा रेवण्णा तिला एकटीला आपल्या खोलीत बोलावत असे. त्या कुटुंबात आणखी सहा महिला काम करत होत्या. प्रज्वल रेवण्णा घरात आल्यावर महिला घाबरायच्या. घरात काम करणाऱ्या काही पुरुष कर्मचाऱ्यांनीही तिला काळजी घेण्यास सांगितले होते, असे या स्वयंपाकी महिलेने सांगितले. रेवण्णाची पत्नी घरी नसताना तो तिला स्टोअर रूममध्ये बोलावून अत्याचार करत होता. किचनमध्ये काम करत असताना रेवण्णाने तिच्यावर अनेकदा बलात्कार केला. प्रज्वल आपल्या मुलीला व्हिडिओ कॉल करायचा आणि तिच्याशी आक्षेपार्ह गोष्टी बोलायचा, त्यानंतर त्याच्या मुलीने त्याचा नंबर ब्लॉक केला.

सध्या महिलेच्या जबाबाच्या आधारे, होलेनरसीपूर पोलिस ठाण्यात वडील आणि मुलगा या दोघांविरुद्ध म्हणजेच एच. डी. रेवण्णा आणि प्रज्वल रेवण्णा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकीय किंवा अन्य काही कामानिमित्त भेटायला येणाऱ्या महिलांचा गैरफायदा घेऊन प्रज्वल त्यांच्यावर अत्याचार करत होता. या मुलींमध्ये काही जिल्हा पंचायत सदस्य, पोलिस कर्मचारी आणि इतर अनेक सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सरकारने या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन केलेल्या विशेष पोलिस पथकाचे प्रमुख, कर्नाटकचे एडीजीपी बी. के. सिंह यांनी याआधी पत्रकार गौरी लंकेश आणि सामाजिक कार्यकर्ते एम. एम. कलबुर्गी यांच्या हत्यांच्या तपासाचे नेतृत्व केले होते. कर्नाटकमध्ये लोकसभेच्या १४ जागांची निवडणूक पार पडत आहे. काँग्रेस पक्ष त्याचे भांडवल करण्याची शक्यता लक्षात घेऊन धर्मनिरपेक्ष जनता दलाने प्रज्वल यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे.

हासन जिल्हा हा भारताचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या कुटुंबाचा बालेकिल्ला आहे. मंड्याव्यतिरिक्त हासन जिल्ह्याला वोक्कालिगा या प्रभावशाली समाजाच्या शक्तीचे केंद्र मानले जाते. अर्थात वोक्कालिगा समाज दक्षिण कर्नाटकमधील इतर जिल्ह्यांमध्येदेखील विखुरला आहे. २०१९ च्या निवडणुकीत प्रज्वल रेवण्णा (एच. डी. रेवण्णा यांचा मुलगा) याच्यासाठी एच. डी. देवेगौडा यांनी हासन मतदारसंघ सोडला होता आणि त्यांनी तुमकुर मतदारसंघातून निवडणूक लढवली होती.

आपल्या कुटुंबात संतुलन राखण्यासाठी त्यांनी असे केले होते. कारण त्यांचा दुसरा नातू निखिल कुमारस्वामी (माजी मुख्यमंत्री एच. डी. कुमारस्वामीचा मुलगा) मंड्या मतदारसंघातून निवडणूक लढवत होता. निखिल कुमारस्वामी आणि त्याचे आजोबा दोघांचाही निवडणुकीत पराभव झाला. एच. डी. रेवण्णा यांनी या प्रकरणाबाबत पत्रकारांना सांगितले की आता 'एसआयटी' नेमण्यात आली आहे. मी 'एसआयटी'समोर हजर होईन. जेव्हा बोलावले जाईल तेव्हा प्रज्वल हजर होईल. या प्रकरणी महिला आयोगाच्या अध्यक्ष डॉ. नागलक्ष्मी यांनी एक पत्र लिहिले होते. त्यानंतर कर्नाटक सरकारने तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले. या दुर्दैवी प्रकारामुळे भाजपच्या हातात आलेल्या मुद्यामुळे ते भविष्यात धर्मनिरपेक्षन जनता दलाचे खच्चीकरण करू शकतात. मात्र त्याआधी काँग्रेस पक्ष या प्रकरणाचा फायदा कसा उठवतो, हे आता पहायचे.

आजकाल

# कोल्हापुरात शाहू महाराजांचे पारडे जड

१५ वर्षांपूर्वी सदाशिवराव मंडलिक यांनी छत्रपती शाहू महाराज यांचे पुत्र युवराज संभाजीराजे छत्रपती यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव केला होता. आता छत्रपती शाहू महाराज व संजय मंडलिक यांच्यात लढत होत असताना पराभवाची परतफेड होणार की पराभवाची मालिका पुढे सुरू राहणार याची उत्सुकता चुरशीच्या लढतीने निर्माण झाली आहे. मात्र प्रचाराचा रंग पाहता शाहू महाराजांचे पारडे जड आहे.

उभय बाजूला बड्या नेत्यांची फौज, कार्यकर्त्यांची मोठी कुमक, मजबूत रसद असल्याने दिवसेंदिवस निवडणुकीचे रंग गहिरे बनत चालले आहेत. काँग्रेसने शाहू छत्रपती यांची उमेदवारी असल्याने राज्याचे लक्ष वेधले आहे. पिता सदाशिवराव मंडलिक यांच्याप्रमाणेच संजय मंडलिक यांनी छत्रपती घराण्याला आव्हान द्यायला सुरू केले आहे.

सदाशिवराव मंडलिक यांनी संभाजी राजे यांच्या विरोधात 'पॅलेस पॉलिटिक्स' असा शब्दप्रयोग प्रचारात आणला वातावरण फिरवले होते. माझ्यासारखा सामान्य घरातील उमेदवार तुम्हाला सहज भेटू शकतो. ती उपलब्धता नव्या राजवाड्यात मिळणार आहे का, या त्यांच्या रोकडता प्रश्नाला मतदारानाचा प्रतिसाद मिळाला होता. अर्थात तेव्हा शरद पवार यांनी मंडलिक यांना डावलल्याची सहानुभूती मतदारांमध्ये होती. वडिलांचा तोच कित्ता संजय मंडलिक गिरवत आहेत. गादी, वारस हा वादळी वादग्रस्त मुद्दा त्यांनी प्रचारात आणला आहे. शाहू छत्रपती यांच्यातील वैगुण्य हेरून त्यावर बोचरी टिपणी ते करीत आहेत. धुळ्याचे राजवर्धन कदमबांडे यांना खास विमानाने पाचारण करून याच मुद्द्याला राजघराण्यातून हवा दिली आहे. त्यावर शाहू छत्रपती यांना वारस इतिहास कथन करणे भाग पडले. मंडलिक यांच्यावरही टीकेचे प्रहार होत आहेत. खोके, गद्दार, बेन्टेक्स खासदार अशी टीका सेनेतून होत असताना उद्धव ठाकरे यांनी मागील वेळी निवडून दिलेले संजय मंडलिक, धैर्यशील म ने यांना पराभव करून सूड उगवायचा आहे, अशी आक्रमक भाषा करीत मतदारांना सांगावा दिला. संपर्काचा अभाव, विकास कामांकडे दुर्लक्ष या मुद्द्यावरूनही संजय मंडलिक यांचे दोष चव्हाट्यावर आणण्यावर विरोधकांची भिस्त आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात राजर्षी शाहू महाराज यांनी साकारलेले विकासपर्व, सामाजिक सलोखा सर्वमान्य आहे. त्यातून उतराई म्हणून शाहू महाराज यांना मतदान करण्याची मानसिकता लाभार्थी वर्गामध्ये दिसून येते. राजर्षींनी केलेल्या कामाचे जरूर स्मरण आहे, पण श्रीमंत शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान काय, असा परखड सवाल मंडलिक यांच्याकडून केला जात आहे. दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांकरवी छत्रपती घराण्यावर राळ उठवली जात आहे. अर्थात हा मुद्दा सर्वांनाच पचनी पडणार नसल्याने मंडलिक यांच्यावर तो उलटूही शकतो. अशा उठाठेवीच्या मुद्द्यांमुळे मतदारसंघ, जिल्ह्याच्या विकासाचे मुद्दे मतदारांना शोधावे लागत आहेत.

मंडलिक यांच्या प्रचारासाठी पालकमंत्री हसन मुश्रीफ, खासदार धनंजय महाडिक या प्रमुखांनी जोरदार प्रचार चालवला आहे. शाहू छत्रपतींच्या प्रचारासाठी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सतेज पाटील, अन्य चार आमदार अशा मातब्बरांची फौज प्रचारात उतरली आहे. शाहू महाराज हे उमेदवार असले तरी सतेज पाटील हेच विरोधकांच्या टीकेचे मुख्य लक्ष्य बनले आहे. टीकाकारांचा समाचार पाटील घेताना दिसत आहेत. त्यामुळे ही निवडणूक मंडलिक विरुद्ध शाहू छत्रपती अशी होण्याबरोबरच ती मंडलिक विरुद्ध सतेज पाटील असाही रंग धारण करताना दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचा फायदा उठवण्यासाठी महायुतीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. हिंदुत्वाचा मुद्दा खालीपर्यंत कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्यावर भर दिला आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात यांच्याकडून मांडला गेलेला मुद्दा मतदारांच्या गळी उतरवण्यासाठी महाविकास आघाडीची यंत्रणा कार्यरत झाली आहे. मागासवर्गीय, मुस्लिम यांच्यात दिसणारा बदल निर्णायक ठरू शकतो. मतदारसंघाच्या उत्तर भागात शाहू महाराजांसाठी परिस्थिती अनुकूल दिसते. दक्षिणेत बड्या नेत्यांमुळे मंडलिक किती मताधिक्य घेतात यावर सारा निकाल अवलंबून असेल.

लोकसंसद

## "झाडे लावा" ही मोहीम परिणामकारक

सध्याचा उन्हाळा अतिशय तीव्र आहे. कित्येक शहराचे तापमान ४० अंशावर गेले आहे. याशिवाय या उन्हाची तीव्रता मोठी आहे. अनेक थंड हवेची ठिकाणे सुद्धा तीव्र उन्हाने व्यापली आहेत. ही तीव्रता दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. महाराष्ट्रात देशात सर्वात जास्त धरणे आहेत. पण त्यातील पाण्याचे साठे मर्यादित स्वरूपाचे आहेत. उन्हामुळे जे साठे आहेत त्याचेही बाष्पीभवन होऊन ते पाणी कमी होत आहे. मुंबईसारख्या शहराला सुद्धा पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. एकूण निसर्ग चक्र बिघडले आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. राज्यातील व देशातील अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे तोडून रस्ते, तयार करण्यात आले आहेत. औद्योगिकीकरण व नागरिकीकरण यामुळे सुद्धा अनेक ठिकाणी वृक्षराजी नष्ट होत चालली आहे. यामुळे आपण आपल्याच हातानी आपला नाश करून घेत आहोत. यावर 'झाडे लावा झाडे जगवा' ही मोहीम राबवावी. आज अनेक ठिकाणी मोकळ्या जागा आहेत. उदा. वाहतुकीचे रस्ते, रेल्वेच्या जागा, बस स्टॅन्ड, अनेक सरकारी जागा, अनेक शाळांच्या जागा या ठिकाणी झाडे लावा ही मोहीम जोरात राबविणे जरुरीचे आहे.

**- शांताराम वाघ**, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**सात मे**

**१८८०:-** प्राच्यविद्या सशोंधक, हिंदुधर्मशास्त्राचे गाढे अभ्यासक महामहोपाध्याय भारतरत्न पांडुरंग वामन काणे यांचा जन्म. सर्व सामान्यांना धर्म कळावा म्हणून त्यांनी दिलेल्या व्याख्याने 'धर्मशास्त्राचा विचार' या नावाने पुस्तकरुपात प्रसिध्द. याशिवाय 'हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र' हा त्यांचा ६००० पृष्ठांचा पंचखंडात्मक ग्रंथ. 'धर्मशास्त्राचा इतिहास' या नात्याने मराठीत प्रसिध्द. **१८८२:-** 'औषधी गुणधर्म शास्त्र' हा चार खंडांचा वैद्यक-ग्रंथ लिहिणारे आद्य मराठी वैद्यलेखक गंगाधरशास्त्री गोपाळ गुणे यांचा जन्म. त्या काळात त्यांनी डेंग्यू, फ्लू आदी रोगांवर पुस्तके लिहिली. 'भिषग्विलास' या औषधशास्त्राला वाहिलेल्या मासिकाचे ते संस्थापक-संपादक होते. शरीररचना, इंद्रियांचे धर्म, रोग व त्यांचे निदान, औषधे यांवर अनेक लेख त्यांनी लिहिले. **१९१०:-** लेखक, कवी, पत्रकार, वक्ते कृ ष्णराव पांडुरंग भालेकर यांचे निधन. 'दीनबंधू' हे सत्यशोधक पत्र त्यांनी सुरु केले होते. 'सुबोध पोवाडे', 'वेठबिगार', 'हितोपदेश', 'शास्त्राधार', 'शेतकऱ्यांचे मधुरगायन', 'पंचखेळ' ही पुस्तके लिहिली. आपल्या लेखनातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. **१९२३:-** नट, नाटककार, चित्रपट अभिनेता, लेखक आत्मचरित्रकार आत्माराम गोविंद भेंडे यांचा जन्म. 'आत्मरंग' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिध्द. १९२६:- लेखक प्रा. डॉ. शरचंद्र शंकर कुलकर्णी यांचा जन्म. 'पूर्णत्वाचे प्रवासी' या त्यांच्या पुस्तकांतून भारतीय संस्कृतीचे दर्शन कथांच्या व आत्मानुभवाच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. **१९२९:-** लेखिका प्रा. डॉ. रोहिणी हेमचंद्र गवाणकर यांचा जन्म. ह्यांनी 'राज्यशास्त्र व राज्यशास्त्राचे सिध्दांत' ही पाठ्यपुस्तके लिहिली. **१९३२:-** लेखिका प्रा. सौ. सुमन यशवंत पाटे (सोमण) यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'ग्रामसेविकेची बालवाडीतील भूमिका', 'सामाजिक विघटन व समस्या' तसेच 'प्रारंभिक समाजशास्त्र हे ११ वी साठी', 'भारतीय समाज हे १२ वी साठी', 'वास्तुशिल्प शास्त्राभिमुख', 'समाजशास्त्राची मुलतत्त्वे' हे इंजिनिअरींगच्या विद्यार्थीसाठी आणि 'समाज शास्त्राची रुपरेषा' हे बी. ए. साठी इत्यादी पुस्तके. **१९४५:-** 'आयदान' या आत्मचरित्रासह 'सहावं बोट', 'चौथी भिंत आणि हातचा एक' (कथासंग्रह), मॉरिशसचे प्रवासवर्णन अशा ललित वाङ्‌मयाखेरीज दलितांचा इतिहास व सद्यस्थितीचा अभ्यास तसेच बौध्द धम्मग्रंथांचा मराठी अनुवाद अशा प्रकारचे ग्रंथलेखनही करणाऱ्या ऊर्मिला पवार यांचा जन्म. विद्रोही साहित्य संमेलनाच्या (२०१३) अध्यक्ष ही त्यांची ताजी ओळख. याशिवाय 'उदान' हे बौध्द तत्वज्ञानाचे भाषांतर आणि 'आम्हीही इतिहास घडवला व डॉ. आंबेडकर जीवनकालपट या पुस्तकाच्या सहलेखिका. १९४८:- वनस्पतीशास्त्राचे प्राध्यापक, निरीक्षक, संशोधक, इतिहास, मोडीलिपी, खगोलशास्त्राचे अभ्यासक, उत्तम वक्ते तसेच नाणी, मूर्ती, शिल्प यांचे जाणकार प्र. के. घाणेकर यांचा जन्म. ५०हून अधिक पुस्तके त्यांनी लिहिली असून त्यामध्ये 'चला जरा भटकायला' हे ट्रेकिंगबद्दल माहिती देणारे मराठीतील पहिलेच पुस्तक. याशिवाय 'कोकणचा मानबिंदू - सिंधुदूर्ग', 'समर्थांचा सज्जनगड', 'शिवतीर्थांच्या अध्यायिका', 'महाराष्ट्र निसर्गदर्शन', 'शालेय विद्यार्थी डोळ्यासमोर ठेवून 'पर्यावरण' ह्या पुस्तकांसह 'जलदुर्गांच्या सहवासात', 'शिवपुत्र संभाजी', 'मैत्री सागर दुर्गांची', 'इतिहास घडवणाऱ्या वनस्पती', 'भटकंती रायगड जिल्ह्यांची' हा त्यांचा सुवर्णमहोत्सवी ग्रंथ आणखी काही पुस्तके त्यांची प्रकाशनाच्या मार्गावर असून लवकरच आपल्या ग्रंथसंपदेची ते शताब्दी साजरी करतील. **१९४९:-** आपल्या उण्यापुऱ्या ११ वर्षाच्या आयुष्यावर 'आमची ११ वर्षे' हे आत्मकथन लिहून मराठी साहित्यावर ठसा उमटवणाऱ्या माधव ज्युलियनच्या पत्नी लीलाबाई पटवर्धन यांचे निधन. **१९५१:-** लेखक, संत साहित्याचे अभ्यासक, अनुवादक लक्ष्मण विनायक परळकर यांचे निधन. बंगाली साहित्याच्या अनुवादासह परळकरांनी प्रार्थना समाजाचा इतिहास हिंदूधर्मप्रदीप या पुस्तकांसह विविध विषयांवर लेखन केले. **१९५४:-** लेखिका नीलम माणगावे यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत ५० एक पुस्तके प्रसिध्द आहेत. त्यामध्ये 'साक्षीदार', 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे कथासंग्रह. 'गुलदस्ता', 'शतकाच्या उंबरठ्यावर', 'जिनज्योत', 'उद्ध्वस्तायन' हे काव्यसंग्रह. 'डायरी' 'जि', 'सोन्या', 'शोध', 'मृत्यूदंड', 'जलप्रलय' 'ब्रेकिंग न्यूज' ह्या कादंबऱ्या. 'उखाण्यातून स्त्री दर्शन' हे लोकसाहित्य. 'जसं घडलं तसं' हे आत्मकथन. 'माजघरातील हुंदके' हे सामाजिक विषयावर आणि 'बोलक्या भिंती', 'एक लिंबू झेलू बाई - दोन लिंबू झेलू', 'तर्क-वितर्क' हे ललित. 'स्त्री आणि तिचे पतिव्रत्य' ह्या समीक्षात्मक ग्रंथासह विपूल प्रमाणात बालसाहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९७२:-** लेखक प्रा. डॉ. रामचंद्र जयवंतराव गायकवाड यांचा जन्म. 'आंबेडकरी चळवळीतील दलितेतर' या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुक्तीच्या लढ्यात १९१९ ते १९५६ या कालखंडात जे जन्माने उच्चवर्णीय होते ज्यांचा उल्लेख वरील पुस्तकात दलितेतर असा करण्यात आला. त्यांचा सहभाग कसा राहिला या संदर्भाने विवेचन करण्यात आलेले आहे. तसेच जागतिकीकरण आणि दलित या पुस्तकाचं सहसंपादन केले आहे आणि समाज प्रबोधन पत्रिकेत विविध विषयांवर लेखन केले आहे. **२०१३:-** विविध विषयांवर लेखन करणारे हरहुन्नरी लेखक आणि लागू बंधू मोतीवाले पेढीचे संचालक श्रीकांत लागू यांचे निधन.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

# कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**कै. प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ, अलिबाग**


# ताम्हिणी घाट वाहतुकीसाठी धोकादायक

## संरक्षक कठडे कमकुवत

## प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव-पुणे महत्त्वाच्या राज्य मार्गावर ताम्हिणी घाटात तीव्र उतार व त्यातच अवघड वळणे यामुळे दिवसेंदिवस अपघात घडत आहेत. त्याचबरोबर रस्त्याकडेला असणारे संरक्षक कठडे कमकुवत झाले आहेत. रस्त्याकडेला असणाऱ्या दरडींमुळे पर्यटक प्रवाशांना आपला प्रवास असुरक्षित वाटत असून, या मार्गावर शासन खास उपयायोजना करीत नाही. त्यामुळे या संरक्षित कठड्यामुळे पुणे मार्गावरून कोकणात येणाऱ्या पर्यटक प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे. पावसाळा जवळ आला असून, या मार्गाने प्रवास करणाऱ्या पर्यटकांत लक्षणीय वाढ होणार आहे. यामुळे शासनाने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी सुरक्षिततेसाठी पाऊल उचलण्याची गरज आहे.

दिघी-पुणे-बंगळुरू जाणाऱ्या या मार्गावर दिवसेंदिवस वाहतूक वाढत आहे. पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याला जोडणारा हा जवळचा मार्ग म्हणून पाहिले जाते. या मार्गावरून पर्यटक प्रवासी मोठ्या प्रमाणात प्रवास करतात. या मार्गावर धोकादायक वळणे व तीव्र उतार असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांना या रस्त्याचा अंदाज येत नाही.



तसेच रस्त्याकडेला असणारे संरक्षित कठडे हे कमकुवत झाले आहेत. तर काही ठिकाणी हे कठडे बांधलेले नाही. त्याचबरोबर रस्त्यालगत असणाऱ्या दरडी ह्या विशेषतः पावसाळ्यात कोसळण्याचे प्रमाण वाढते. पावसाळा महिन्यावर येऊन ठेपला असून, या गंभीर प्रश्नांकडे संबंधित खात्याने लक्ष घालून उपयायोजना करणे गरजेचे आहे. ताम्हाणी घाटातील अवघड धोकादायक वळणे काढून सुलभ व पर्यायी रस्ता काढावा तसेच ज्या ठिकाणी संरक्षक कठडेंची आवश्यकता आहे. तेथे संरक्षक कठडे उभ्या करावेत व कमकुवत झालेले संरक्षण कठडे नव्याने बांधावेत, अशी मागणी नागरिक, प्रवासी व पर्यटकातून सतत होत आहे.

# लग्नसराईमध्ये खालूबाजाला वाढती मागणी

**। शिहू । वार्ताहर ।**

कोकणातील ग्रामीण भागातील वाद्यवृंदामध्येएकपारंपरिकवाद्यकला म्हणजे खालूबाजा. लग्नसमारंभ, मिरवणूक, सण-उत्सव अशा मंगलप्रसंगी खालूबाजा प्रामुख्याने आढळून येतो. अर्थात, वाजविला जातो. एक ढोल, एक टिमकी आणी एक सनई या वाद्याचा संच म्हणजे खालूबाजा म्हणून ओळखला जातो. गेल्या अनेक वर्षांपासून मंगलसमयी खालूबाजा वाजविला जातो. सध्या सर्वत्र लग्नसराई सुरू असल्यामुळे बहुतांश ठिकाणी खालूबाजा पाहावयास मिळतो.

सनईच्या सुरावर जुनी पारंपरिक गाणी वाजवली जातात आणि



त्याला ढोल-टिमकीची साथ यामुळे पावले आपोआप थिरकायला लागतात. बऱ्याच ठिकाणी बेंजो, ढोलताशे, डीजेची क्रेज असते. मात्र, खालूबाजाची रंगतच न्यारी असते. सध्याच्या आधुनिक युगाला अनुसरून दिवसेंदिवस या वाद्यकलेत वाद्यसंगीतात बदल होत आहे. पण, याचा लोकमागणीवर कोणताही परिणाम नाही. उलट, दिवसेंदिवस खालूबाजाची मागणी वाढत आहे.

# माणगावात मोफत नेत्रतपासणी शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार, दि. ८ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत एचडीएफसी बँकेच्या समोर, मुंबई-गोवा महामार्गालगत पेपर विक्रेते नितीन मेथा यांचे सभागृह, जुने एसटी स्टँड माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे. या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास तीदेखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची, राहण्याची, जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्र रुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा ८६९८७४०६४०, सुप्रिया संतोष शिंदे ९०४९६६५५९८ यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# शासनाच्या नाकर्तेपणाचा कोळी बांधवांना फटका

## मासळी रस्त्यावर सुकविण्याची वेळ

**। उरण । वार्ताहर ।**

कोळी बांधवांनी आपल्या परंपरागत व्यवसायाला पुनर्जीवित करून समुद्रात मिळालेल्या मासळीचे सुक्या मासळीत रूपांतरित करून तिच्या विक्रीचा व्यवसाय सुरू करून आपल्या कुटुंबाच्या संसाराला आधार दिला आहे. परंतु, शासनाच्या नाकर्तेपणामुळे कोळी बांधवांना चक्क रहदारीच्या रस्त्यावरच समुद्रातील ओली मासळी वाळत घालण्याची वेळ आल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.

उरण, पनवेल तालुक्यातील करंजा, मोरा, हनुमान कोळीवाडा, दिघोडे, कोप्रोली, कुंडेगाव व केळवणे ग्रामपंचायत हद्दीत कोळी समाजाची मोठी वस्ती आहे. या कोळी बांधवांना आपल्या उदरनिर्वाहासाठी शेती किंवा आणखी कोणतेही साधन नसल्याने आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह हा मासेमारी करून करावा लागत आहे. परंतु, समुद्रातील वाढत्या प्रदूषणामुळे खोल समुद्रात मासळी



मिळणे कठीण झाले आहे. दुसऱ्याच्या बोटीवर काम करीत असल्याने या बांधवांना मजुरी मिळणेही कठीण झाले आहे. त्यामुळे सुक्या मासळीचा व्यवसाय करण्याचा निर्णय गरीब कोळी कुटुंबातील सदस्यांनी घेतला आहे.

सदर गरीब कोळी कुटुंबातील सदस्य हे मुंबई, करंजा, मोरा व अलिबाग या ठिकाणावरुन मासेमारी बंदरातून ओली सुकट, ओल्या वाखट्या, बोंबील अशा विविध प्रकारची मासळी विकत आणतात. परंतु शासनाच्या मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी खाडीकिनारी किंवा गाव परिसरात ओली मासळी वाळत घालण्यासाठी ओट्यांची सुविधा उपलब्ध करून न दिल्याने तसेच काही गाव परिसरात ओट्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे

> शासनाच्या मत्स्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी उरण, पनवेल तालुक्यातील कोळी बांधवांसाठी सुकट, वाखट्या, बोंबील, टेंगली, शिंगाला ही मासळी वाळत घालण्यासाठी सुसज्ज अशा ओट्यांची उभारणी करुन देण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि गाव परिसरात निकृष्ट दर्जाच्या ओट्याच्या कामांची चौकशी करावी.
> - कांचन कोळी

(तकलादू) केल्याने सदर कोळी बांधवांना चक्क रस्त्याच्या कडेला मासळी उन्हात सुकवून तिचे सुक्या मासाळीत रूपांतर करावे लागत आहे, असे येथील कोळी बांधवांचे म्हणणे आहे.

# कुपोषित मुलांसाठी पोषण केंद्राचे उद्घाटन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील खांडस या भागातील कुपोषित बालकांसाठी युनायटेड वेकडून कुपोषण निर्मूलनासाठी गेली दहा वर्षे प्रयत्न करीत आहेत. त्याच माध्यमातून पोषण केंद्र खांडस येथे सुरू करण्यात आले आहे.

कर्जत ग्रामीण भागात युनायटेड वेकडून कुपोषण निर्मूलनासाठी भागात प्रकल्प पोषण कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत पोषण कार्यकर्ते आणि कुपोषित मुलांच्या पालकांना समुपदेशन करून मुलांना कर्जत येथे एनआरसीमध्ये घेऊन येण्यासाठी सांगतात. त्यातील काही पालक मुलांच्या आरोग्यासाठी तयारही होतात. परंतु येथे आल्यावर दवाखान्यामध्ये जास्त दिवस राहण्यास तयार नसतात. जर अतितीव्र कुपोषित बालके आहेत, तर त्या बालकास कमीत कमी सात ते २१ दिवस दवाखान्यात डॉक्टरांच्या देखरेखीखाली राहावे लागते. परंतु, हे पालक अतिदुर्गम भागातून आले



असल्यामुळे तेथे ॲडमिट राहण्यास तयार नसतात.

युनायटेड वे मुंबई यांनी ग्लीलनेस हॉस्पिटल यांच्या विद्यमानाने प्राथमिक आरोग्य केंद्र खांडस या ठिकाणी पोषण केंद्राची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या ठिकाणी मुलांसाठी वेगळाच एक सुसज्ज रूम तयार करण्यात आला आहेत. त्यामध्ये मुलांच्या उपचारासाठी सर्व साधनांची उपलब्ध करून देण्यात आली.

तसेच या मुलांसाठी आणि पालकांसाठी येथे दिवसभर राहण्याची सोय वेगळा किचन, बाथरूम, बेड तसेच मुलांना करण्यासाठी खेळण्याचीसुद्धा व्यवस्था केलेली आहे. जेणेकरून त्यांच्यावर उपचारही होतील आणि त्यांना दवाखान्यामध्ये आल्यासारखं वाटणार नाही आणि कर्जत तालुक्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी होईल.

या उद्घाटनप्रसंगी रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा विखे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र खांडस डॉ. आरती माने, ग्लीलनेस हॉस्पिटलचे हेमंत गुप्ता, डी.जी.एम. सेल्स आणि मार्केटिंग हेड कॉर्पोरेट आणि कम्युनिटी बिजनेस, रश्मी सावंत नरसिंग ॲडमिन सुपरवायझर, लय तायडे फायनान्स टीम हेड, तसेच युनायटेड वे मुंबईचे डॉ. शैलेश, रेणुका आणि प्रकल्प पोषणचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# करळफाटा बसस्थानकाची दुरवस्था

## स्लॅब तुटल्याने प्रवाशांच्या जीवितास धोका

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील उरण-पनवेल महामार्गवरील प्रसिद्ध करळफाटा येथील करळ, सोनारी आणि सावरखार या तिन्ही गावांतील नागरिकांसाठी असलेल्या बसस्थानकाची दुरवस्था झाली आहे. यामुळे या स्थानकावरून प्रवास करणाऱ्या प्रवासी आणि विद्यार्थ्यांना उन्हाचे चटके बसू लागले आहेत. त्याचप्रमाणे स्थानकाचा स्लॅब तुटल्याने याचा धोका निर्माण झाला आहे.

जेएनपीए प्रशासनाने या स्थानकाची दुरुस्ती करावी, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे. जेएनपीएसारख्या जागतिक पातळीवरील बंदराच्या हद्दीत मोडणाऱ्या करळ, सोनारी व सावरखार हे तीन गावे आहेत. या



परिसरात अनेक सुविधा जेएनपीएने दिल्या आहेत. बंदराला जोडणारे रस्ते तयार करण्याचे काम सूरु आहे. मात्र, त्याचवेळी एकेकाळी प्रसिद्ध असलेल्या करळ फाटा आता नष्ट झाला आहे.

जेएनपीए साडेबारा टक्केचा दिबांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या लढ्याची व प्रकल्पग्रस्तांच्या न्याय हक्कांसाठी झालेल्या मोर्चे आंदोलनाची खरी साक्ष ही करळफाटा होता. या फाट्यावरून प्रवास करणाऱ्या तीन गावातील नागरिक आणि प्रवासी हे येथील बस साठी येथील स्थानकातून प्रवास करीत आहेत. मात्र, हे स्थानक नादुरुस्त झाले आहे. त्यामुळे त्याची दुरुस्ती करण्याची मागणी येथील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# गावठी हातभट्टीची दारु जप्त

**। पेण । प्रतिनिधी ।**

हातभट्टीची दारू स्वस्थ असल्याने ग्रामीण भागात सर्रास हातभट्टीच्या दारूची विक्री केली जाते. आज वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक ठिकाणी हातभट्टीची दारू तयार केली जाते. मात्र पोलीस खाते याकडे दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात असल्याने दारू विक्रेत्यांचा धाडस वाढलेले आहे.

पेण तालुक्यातील निगडे येथे हिरामण पांडुरंग नाईक, रा. निगडे, पो. आमटेम, ता. पेण यांनी रू २७००/- किमतीची आठ लीटर गावठी हातभट्टीची तयार दारू बाळगल्याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार आतिश गायकवाड यांनी फिर्याद दाखल केली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, वडखळ पोलीस ठाणे हद्दीतील निगडे येथे हिरामण नाईक यांच्या घरासमोर असलेल्या आंब्याच्या झाडाजवळ मोकळ्या जागेत, पेण हिरामण पांडुरंग नाईक याने शासनाने प्रतिबंधित केलेली गावठी हातभट्टीची दारू २७००/- स्वत:च्या कब्जात बाळगल्याचे दिसून आले. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास महिला पोलीस हवालदार गीता गंगेश धुपकर करीत



आहेत. पालखार येथे हिरामण मोतीराम म्हात्रे पालखार, ता. पेण यांनी रू २४००/- किमतीची नऊ लीटर गावठी हातभट्टीची तयार दारू बाळगल्याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार प्रशांत प्रकाश देशाई यांनी फिर्याद दाखल केली आहे. निगडे येथे हिरामण म्हात्रे यांचे घराच्या पाठीमागे पश्चिमेस आंब्याच्या झाडाखाली दारू स्वत:चे ताबेकब्जात एकूण २७००/- रूपये किमतीचे विनापरवाना बाळगल्याच्या स्थितीत मिळून आला. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास महिला पोलीस हवालदार चवरकर करीत आहेत.



# संचालकपदी आदिनाथ पाटील यांची निवड

**। खरोशी । वार्ताहर ।**

पेण शिक्षक पतपेढीची सभा शुक्रवारी (दि. ३) पार पडली. या सभेमध्ये कार्यलक्षी संचालक म्हणून आदिनाथ पाटील विषय शिक्षक रा.जि.प.शाळा-कणे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी पतपेढीचे विद्यमान चेअरमन रवी पाटील, व्हाईस चेअरमन मोरे सर, संस्थेचे माजी चेअरमन तथा विद्यमान मानद सचिव सोपान चांदे, संचालक विठोबा पाटील, मोहन भोईर, वसंत मोकल, तसेच संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रमोद पाटील, पतपेढीचे माजी चेअरमन अमरचंद पाटील, नंदकुमार थवई, किशोर पाटील, राजेंद्र पाटील, तालुका अध्यक्षा सावंत मॅडम, गजानन पाटील, प्रवीण पाटील उपस्थित होते.

पान १ वरुन

# मतदार तटकरेंना धक्का देण्याच्या तयारीत?

भाजपाच्या मांडीवर जाऊन बसले. यासाठी त्यांनी शरद पवार यांच्या पाठीत खंजीर खुपसल्याची चर्चा गल्लीबोळात होत आहे. त्यामुळे जनता कमालीची नाराज आहे. तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत, असे भाजपा नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेण येथील जाहीर सभेत वक्तव्य केल्याने मराठा, ओबीसी, दलित आणि मुस्लीम मतदारांमध्ये मोदींविरोधातील खदखद अजून बाहेर आली. देशभरात मोदींवर आता कोणाचा फारसा विश्वास राहिलेला नाही. तटकरेंना मत म्हणजे मोदींना मत हेच फडणवीस यांचे स्टेटमेंट बूमरँग होणार असल्याचे बोलले जाते.

तटकरेंनी आपल्या भाषणात नेहमीच सांगितले आहे की, निसर्ग आणि तौक्ते चक्रीवादळामध्ये रायगड-रत्नागिरी जनतेला मदत केली. वादळानंतर लगेच तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे रायगडमध्ये पाहणी करण्यासाठी आले होते. त्यांनी तातडीने १०० कोटी रुपयांची मदत जाहीर केली. त्यानंतरही महाविकास आघाडी सरकारने मदतीचा ओघ सुरुच ठेवला होता आणि तीच मदत तटकरे यांनी वाटली. कोणतेही सरकार असो. जनतेवर आलेले संकट दूर करणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आणि जबाबदारी आहे. त्यामुळे कोणीही नेता खिशातून मदत करत नाही, हेदेखील जनता विसरत नाही. गीते हे स्वच्छ चारित्र्याचे नेते आहेत. ३५ वर्षांत ते मंत्री, खासदार असताना एकही भ्रष्टाचाराचा आरोप त्यांच्यावर झालेला नाही. त्यामुळे मतदारांना ते आकर्षित करण्यात यशस्वी झाल्याचे प्रचार सभेतील गर्दीवरुन दिसून येते. उद्धव ठाकरे यांनी कडवे हिंदुत्व बाजूला सारत राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व असे सांगितले. त्यामुळे सर्व धर्मातील विशेषतः मुस्लिम मतदारांमध्ये एक आपुलकीचा विश्वास निर्माण करण्यास ठाकरे यांना यश आले. त्याचा फायदा हा थेट मतपेटीतून गीते यांना होणार हे कोणीच नाकारु शकणार नाही. गीतेंच्या सोबतीला शेकापच्या जयंत पाटील यांचा भक्कम पाठिंबा आहे, तसेच काँग्रेसही गीतेंना विजयी करण्यासाठी पुढे सरसावली आहे. या गीतेंच्या जमेच्या बाजू आहेत. गुहागरमधून आमदार भास्कर जाधव यांची जोडदेखील गीतेंना मिळणार असल्याने गीतेंचा विजय हा नजरेच्या टप्प्यात आल्याचे दिसते.

# करकरेंचा मृत्यू पोलीस अधिकाऱ्याच्या गोळीने?

यासंबंधी दोन पुरावे आहेत, एक फॉरेन्सिक सायन्सचा रिपोर्ट, ज्यात गोळ्यांसंदर्भातला रिपोर्ट आहे आणि कोर्टातला केसचा निकाल, या दोन गोष्टींच्या आधारावर माझं मत आहे. कोर्टाच्या निकालामध्ये स्पष्ट म्हणलं आहे की, करकरेंच्या शरीरात ज्या गोळ्या मिळाल्या, त्या अजमल कसाब किंवा इस्माईल खान यांच्या रायफलमधून उडवलेल्या नव्हत्या. त्या निकालामध्ये आणि फॉरेन्सिकच्या रिपोर्टमध्ये असंही म्हटलं आहे, पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये करकरेंच्या बॉडीवर त्यांच्या मानेपासून ते खांद्याच्या दोन इंचाच्या भागापर्यंत रिव्हॉल्वरने पाच गोळ्या वरून खाली पोटात मारल्या आहेत. पाच गोळ्या मारल्या त्यातल्या तीन निघून गेल्या, दोन पोटातच राहिल्या, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला', असा दावा मुश्रीफ यांनी केला आहे. 'या कुणाच्या गोळ्या होत्या? कारण पोस्टमॉर्टम रिपोर्ट त्यावेळी कोर्टासमोर होता. तो पोस्टमॉर्टम रिपोर्ट उज्ज्वल निकम यांच्याकडे होता. त्यांनी त्याचवेळी कोर्टाला विनंती करायला पाहिजे होती की त्यांनी तपास यंत्रणांना आदेश द्यावा, या गोळ्या कुणी मारल्या याची चौकशी करा. गोळ्या कुणी मारल्या हे त्यांना माहिती होतं, त्यामुळे त्यांना वाचवण्यासाठी त्यांनी तशी विनंती कोर्टाला केली नाही', असं मुश्रीफ म्हणाले.

'मागच्या तीन-चार वर्षात मी स्वत: याचा तपास केला. २०१९ पर्यंत मी तपास केला आणि परिस्थितीजन्य पुरावा मी तयार केला, त्याच्यावरून संजय गोवीलकर नावाचे एक असिस्टंट पोलीस इन्सपेक्टर होते त्यांनी या गोळ्या मारल्या या निर्णयापर्यंत मी आलो. याचा पुन्हा तपास व्हावा. तिघांच्याविरोधात गुन्हे दाखल व्हावेत. प्रभाकर आलोक ज्यांनी हल्ला होणार ही माहिती लपवून ठेवली. संजय गोवीलकर ज्यांनी या गोळ्या करकरेंना मारल्या आणि ही माहिती लपवणारे उज्ज्वल निकम, या तिघांवर गुन्हे दाखल व्हावेत', असे खळबळजनक आरोप मुश्रीफ यांनी केले आहेत. 'हा मुद्दा आता का उपस्थित झाला मला माहिती नाही. यात राजकारण असू शकेल, पण त्यामुळे काही चांगलं होत असेल तर बरं आहे ना. हा निवडणुकीचा मुद्दा नाहीये. निवडणूक झाली तरी हा मुद्दा चालू राहिला पाहिजे, याचा पाठपुरावा झाला पाहिजे', अशी मागणीही मुश्रीफ यांनी केली आहे.

# विदेशी प्रतिनिधींचे भारतीय पारंपरिक पद्धतीने औक्षण

सात देशांतील प्रतिनिधी आले आहेत.या विदेशी प्रतिनिधी मंडळाचे अलिबाग-मांडवा जेट्टी येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी स्वागत केले. यावेळी भारतीय संस्कृतीनुसार पारंपरिक पद्धतीने औक्षण, फेटा आणि हार घालून स्वागत करण्यात आले. विदेशी प्रतिनिधी मंडळामध्ये बांगलादेशचे दोन प्रतिनिधी महंमद मोनिरुझ्झमन टी, जी.एम. शाहताब उद्दीन (बांगलादेश निवडणूक आयोग अधिकारी), कझाकिस्तानचे दोन प्रतिनिधी नुरलान अब्दिरोव, आयबक झीकन (केंद्रीय निवडणूक आयोग कझाकिस्तान), श्रीलंकेच्या सिलया हिलक्का पासिलीना (संचालक श्रीलंका), झिम्बाबेचे न्यायमूर्ती प्रिशीला चिगूम्बा आणि सिम्बराशे तोंगाई (केंद्रीय निवडणूक आयोग झिम्बाबे) यांचा समावेश आहे. या प्रतिनिधींनी जेएसएम म हाविद्यालयात सुरु असलेल्या मतदान केंद्रस्तरीय पथकाच्या साहित्य वाटपाची पाहणी केली. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर जाण्यासाठी केलेल्या वाहतूक व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. त्याचबरोबर मतदान यंत्राविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी त्यांना एकूण मतदान प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली. डॉ. ज्योत्स्ना पडियार यांनी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट याविषयी प्रत्यक्ष हाताळणी करून दाखविले. नेहुली येथील स्ट्राँगरूमचीदेखील पाहणी केली. मतदानानंतर स्ट्राँगरूममध्ये जमा करण्यात येणाऱ्या मतदान यंत्राची विधानसभा मतदारसंघनिहाय रचना केली जाते, त्याची पाहणी केली. तसेच त्यांनी त्याविषयी सविस्तर माहिती घेतली. मतमोजणी कशा पद्धतीने होते, मतमोजणी केंद्राची रचना, आवश्यक त्या सर्व बाबींची माहिती घेतली.

# मोहाडी गावाचा मतदानावर बहिष्कार

तो केव्हाच निकामी झालेला आहे. अक्षरशः निकामी झालेल्या या पुलावरुन रहिवाशांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते. या गावची एकूण लोकसंख्या १२०० असून, ५५८ मतदार आहेत. याविषयी गावचे ज्येष्ठ नागरिक मालू निरगुडा यांच्याशी भ्रमंती ध्वनीवरुन संपर्क केला असता त्यांनी आम्ही प्रांत कार्यालयात रितसर लेखी निवेदन दिले आहे, असे सांगितले.

# उद्यानाच्या आरक्षित जागेवर मलनि:सारण प्रकल्प

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहर सध्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाच्या संक्रमणातून जात आहे. शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून घेण्यासाठी प्रकल्प राबविला जात आहे. मात्र, शहरात वेगेवेगळ्या सहा ठिकाणी सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबविले जात असून, त्यातील पंचशील नगर येथील उद्यानाच्या जागेवरील मलनि:सारण प्रकल्पास स्थानिकांनी विरोध केला आहे.उद्यानासाठी स्थानिकांनी ती जागा राखून ठेवली आहे आणि त्या ठिकाणी जागा मोकळी दिसल्याने मलनि:सारण प्रकल्प उभारण्यास विरोध असल्याचे पत्र पालिकेकडे देण्यात आले आहे.

माथेरान शहारातील भौगोलिक रचना लक्षात घेऊन सांडपाण्याचे नियोजन करण्यासाठी शहरात सहा ठिकाणी मलनि:सारण प्रकल्प उभारले जाणार आहेत. त्यासाठी शासनाचे ५० कोटी रुपये खर्च होणार असून, गेल्या महिन्यापासून प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे. प्रामुख्याने नागरी वस्तीमध्ये घरे जवळ जवळ असल्याने त्या भागातील सांडपाण्याचे नियोजन करण्यासाठी ते सांडपाणी एकत्रित केले जात आहे. नागरी भागात सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प उभारले जात असून, त्यातील पंचशील नगर भागात एक सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प उभारला जाणार आहे. पंचशील नगर प्रवेशद्वाराच्या जवळ स्थानिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान उभारण्यासाठी भूखंड राखून ठेवला आहे. त्या भूखंडावर अनेक वर्षे स्थानिकांनी कोणालाही अतिक्रमण



करून बांधकाम करू दिले नाही. त्यात संपूर्ण पंचशील नगरमधील लोकवस्ती ही या भागात खालच्या भागात आहे तर प्रकल्पासाठी निवडण्यात आलेली जागा हि वर आहे. त्यामुळे सांडपाणी पंप लावून उचलून घ्यावे लागणार आहे.ते गुरुत्वाकषणाचा नियमाचा आधार घेता सहज शक्य नाही आणि त्यामुळे त्या ठिकाणाचा प्रकल्प यशस्वी होण्याची शास्वती फार कमी आहे.

मात्र आम्ही भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने उद्यान विकसित करण्यासाठी आणि त्या उद्यानांत बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यासाठी जागा राखीव ठेवली आहे. असे असतानादेखील पालिकेकडून स्थानिकांना विश्वासात न घेता सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम सुरु करण्याचे नियोजन सुरु आहे. त्यास स्थानिक नागरिकांच्या

> पंचशील नगर येथील मोकळ्या जमिनीवर सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प उभारला जाणार आहे. ती जागा पालिकेने अद्याप कोणत्याही उद्यानासाठी राखीव ठेवण्यात आलेली नाही. मात्र, स्थानिकांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य निर्णय घेतला जाईल असे आश्वासन नागरिकांना दिले आहे.
> - अभिमन्यू येळवंडे, नगर अभियंता

वतीने आरपीआय आठवले गटाचे शहर अध्यक्ष अनिल गायकवाड यांनी विरोध करणारे पत्र माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेस दिले आहे. पालिका आमचे म्हणणे ऐकून घेणार नसेल तर आम्हाला आमच्या महापुरुषांच्या नावे राखून ठेवलेली जमीन वाचविण्यासाठी आम्ही सर्व एकत्र येऊन पालिकेला विरोध करणार आहोत.

निवडक

## सुट्टीत पोहण्याला पसंती

**खांब :** उन्हाळी सुट्टी म्हणजे बच्चे कंपनीला आनंद देणारी पर्वणी ठरते.याच सुट्टीचा फायदा घेऊन बच्चे कंपनीकडून पोहण्याचा आनंद लुटला जात आहे. बहुतेक शाळांचे वार्षिक परीक्षांचे निकाल मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात लागले आहेत. दिवसेंदिवस उन्हाच्या झळा तीव्र होऊ लागल्याने चालू शैक्षणिक वर्षात सर्व शाळांना २ मे पासूनच उन्हाळी सुट्टी जाहिर करण्यात आली आहे. या सुट्टीच्या कालावधीत बच्चे कंपनीकडून मामाच्या गावाला जाणे, विविध छंद जोपासणे, पोहण्याचा आनंद लुटणे आदी बेत आखले आहेत.

## मोहोपाड्यात बालिकेचा मृत्यू

**रसायनी :** नवीन पोसरी मोहोपाडा येथ ममता जाधव यांनी दोन गोंडस मुलींना जन्म दिला आणि त्यांच्या घरात एक नवचैतन्य निर्माण झाले होते. रिद्धी आणि सिद्धी असे मुलींचं नावही ठेवण्यात आलं. २१ दिवसाच्या रिद्दीला दुपारी अचानक उचकी लागल्याने तिला तिच्या घरच्यांनी ताबडतोब खाजगी रुग्णालयात नेले. खाजगी रुग्णालयातील डॉक्टरांनी उपचार करून तिला पुढे चौक येथे ग्रामीण रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला. ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी रिद्धीला मृत घोषित केले.

## विकास म्हात्रे सेवानिवृत्त

**सुतारवाडी :** सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय वांगणीचे ज्येष्ठ शिक्षक विकास म्हात्रे हे ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ५ मे रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती प्रसंगी वांगणी हायस्कूलमध्ये शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक टिळक खाडे यांनी केले. कार्यक्रमास माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच मित्रपरिवार वांगणी, बाळसई, वाकण परिसरातील विद्यार्थी चाहता वर्ग तसेच राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## वन्यजीवांसाठी पाणी उपक्रम

**उरण :** उष्णतेची लाट सुरू असून माणसाला या उष्म्याच्या झळा सोसाव्या लागत असताना वन्यजीवांची काळजी करीत चिरनेरमधील जंगलात कोरड्या पडलेल्या पाणवठ्यात ड्रमने पाणी वाहून नेत हे पाणवठे भरले जात आहेत. उरणच्या निसर्गप्रेमी आणि पर्यावरणवाद्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे. जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत कमी झाले आहेत किंवा नष्ट केले आहेत. त्यामुळे वन्यजीवांची होणारी काहिली थांबविण्यासाठी चिरनेरच्या फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेने पाणवठे भरण्याचे काम केले आहे.

## हिरव्या कैऱ्यांना मागणी

**खांब :** उन्हाळी हंगामात दरवर्षी आंब्याच्या झाडाला लागणाऱ्या कैऱ्यांना मोठी मागणी वाढल्याने आवकही बऱ्यापैकी होऊ लागली आहे. आंबा म्हणजे फळांचा राजा या फळातील विविध गुणवैशिष्ट्यांमुळे कायमच सर्वांच्या पसंतीस उतरला आहे.तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारात आंबा फळाला मोठी बाजारपेठ मिळत असल्याने या फळाला दरवर्षी मोठी मागणी असते.त्यातच आंब्याच्या हिरव्या कैऱ्या आंबड तसेच तुरट लागत असल्याने त्यांनाही नेहमीच मोठी मागणी असते.

# वाहतूक कोंडीची साडेसाती संपेना !

**। माणगाव । वार्ताहर ।**

**होळी उत्सव संपून महिना लोटला तरीही मुंबई गोवा महामार्गावरील माणगाव व इंदापूर शहरातील बाजारपेठेतील रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होत नाही. त्यामुळे या शहराच्या दोनही बाजूला मोठ्या प्रमाणात वाहनांच्या लांबच रांगा लागत असल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे इंदापूर व माणगाव मधील नागरिकांची डोकेदुखी वाढली आहे. या बाजारपेठेचा रस्ता कधी मोकळा श्वास घेणार असा मार्मिक सवाल नागरिक उपस्थित करीत असून होळी नंतरही माणगावातील वाहतूक कोंडीची साडेसाती संपता संपेना झाली असून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**



लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाल्याने प्रवासी नागरिकांचीही लगबग मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. त्यातच शाळा विद्यालयाच्या परीक्षा आटोपल्यानंतर गावी जाण्याची लगबग सुरु झाली त्यातच लग्नसराई सुरु झाल्याने नागरिकांनी गावाकडे कूच केली आहे. त्यामुळे माणगाव बाजारपेठेत पुन्हा वाहतुकीची कोंडी झाली असून त्याचा फटका नागरिकांना बसला आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बाजारपेठेत दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी झाल्याने पर्यटक नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली असून सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत दिवसभर माणगावात वाहतूक कोंडी महामार्गावर मोठ्या प्रमाणात पहायला मिळाली. याचा फटका प्रवासी नागरिकांना चांगलाच बसला असून या वाहतूक कोंडीचे कोडे कधी सुटणार हा प्रश्न नागरिकांना भेडसावत आहे.

पुणे व पश्चिम महाराष्ट्रातून पर्यटक मोठ्या प्रमाणात पर्यटनासाठी रायगडात आले आहेत. दर शनिवार रविवार व हॉलीडे आला की, माणगाव बाजारपेठेत प्रवासी नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला आहे. माणगावचे दोन्ही बाजूंनी येणाऱ्या जाणाऱ्या वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीशी सामना प्रवासी नागरिकांना करावा लागत आहे.

उन्हाळ्याचे दिवस असल्याने दरम्यानच्या काळात या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. त्यामुळे पर्यटक नागरिकांच्या उत्साहावर वाहतूक कोंडीचे पाणीच पडले. कोकण व तळ कोकणात जाणाऱ्या व येणाऱ्या नागरिकांना या वाहतूक कोंडीशी सामना करावा लागला. दर शनिवारी-रविवारी माणगाव व इंदापूर येथील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर वाहतूक कोंडी पाहायला मिळते. या दोन्ही बाजारपेठेला बायपास काढण्याचे काम गेले अनेक वर्षापासून सुरु असून ते काम रखडले असल्याने नागरिकांना याचा नाहक फटका बसत आहे.

# माय-दे-देउस यात्रा उत्साहात

## ■ ख्रिस्ती बांधव व भगिनींची मोठी उपस्थिती

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

रेवदंडयातील ऐतिहासीक काळाच्या स्मृती जागविणारा पोतृगिज कालीन माय-दे-देउस यात्रा मोठया उत्साहात संपन्न झाली. या उत्सवाचे निमित्ताने मुरूड तालुक्यातील कोर्लई व संपुर्ण महाराष्ट्रात विखुरलेल्या ख्रिस्ती बांधव व भगीनीची मोठी उपस्थिती होती.



रेवदंडा गोळा स्टॉप नजीक कोर्लईच्या ख्रिस्ती बांधव व भगीनीचे श्रध्दास्थान असलेले प्राचीन माय-दे-देउस मंदिर आहे. या मंदिरात प्रतिवर्षी फक्त ५ मे या दिवशीच मोठी उत्सव यात्रा संपन्न झाली. कोर्लई येथील ख्रिस्ती बांधव व भगीनीसह मोठया संख्येने विखुरलेले ख्रिस्ती बांधव व भगीनी यांच्या उपस्थितीत मोठया उत्साहाने माय-दे-देउस मंदिरात श्रध्दा व भाविकतेने उत्सव साजरा करण्यात आला. गेले महिनाभर पारंपारीक पध्दतीने कोर्लई येथून रेवदंडा माय-दे-देउस मंदिरात चालत येउन मोठया भक्तीने पूजाअर्चा ख्रिस्ती बांधव व भगिनींने केली.

माय-दे-देउस उत्सवाचे दिवशी मंदिरात पूजाअर्चा, प्रार्थना व आरतीचा कार्यक्रम सकाळी ९ वाजण्याचे सुमारास संपन्न झाला, त्यानंतर रितीरीवाजाप्रमाणे माय-दे-देउस मातेची पालखी रेवदंडा बाजारपेठेतून काढण्यात आली. रेवदंडा बाजारपेठेत असंख्य ख्रिस्ती बांधव व भगिनीसह माय-दे-देउस मातेची शिस्तंबध्द पालखी सोहळा पहाण्यासारखा असतो. रेवदंडा बाजारपेठेतून थेट विठोबा आळी मार्गे पुनस्यः मातेच्या मंदिराकडे पालखी सोहळा प्रस्थान करतो.

माय-दे-देउस मंदिर प्रांगणात ख्रिस्ती बांधव कोर्लई चर्च फादर यांचे मार्गदर्शनाखाली सत्कार सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यावेळी विविध स्तुत्य उपक्रम ासह मान्यवर ख्रिस्ती बांधवाचा सत्कार करण्यात आला.

# माथेरान पर्यटनस्थळी येणाऱ्या पर्यटकांसाठी मेजवानी

## ■ मे महिन्यात संगीत मैफिल,अश्व शर्यतींचा थरार

**। माथेरान । वार्ताहर ।**

मुंबई - पुणे भागात तापमानाचा पारा वाढल्याने अंगाची लाही - लाही होत असताना माथेरानमधील वातावरणात मात्र कमालीचा गारवा जाणवत आहे.या गारेगार वातावरणाचा आनंद घेण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना अश्व शर्यतींना थरार व सुरेल संगीत मैफिलीची मेजवानी मिळणार आहे.



महाराष्ट्रातील प्रदूषणमुक्त थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असलेल्या माथेरान मध्ये उन्हाळी सुट्ट्यांच्या हंगामात पर्यटक मोठ्या प्रमाणावर दाखल होतात.हे युनिक पर्यटनस्थळ येथील थंड वातावरण गर्द वनराई, घोडेस्वारी आणि नॅरोगेजवर डोंगरदरीतून धावणाऱ्या मिनिट्रेन करिता प्रसिद्ध आहे.

निसर्गरम्य थंड वातावरणात दोन चार दिवसांच्या मुक्कामी पर्यटक येऊ लागले आहेत.येथे येणाऱ्या पर्यटकांच्या मनोरंजनासाठी शहराच्या मुख्य मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या माधव गार्डनमध्ये गाण्यांची संगीत मैफिल तसेच हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुलात अश्व शर्यतींचा थरार पहावयास मिळणार आहे.

## श्रीधर म्हात्रे यांचे निधन

**उरण :** उरण तालुक्यातील केगाव, विनायक - रानवड येथे राहणारे साईंबाबा भक्त श्रीधर बाळकृष्ण म्हात्रे यांचे वृद्धपकाळाने शुक्रवारी (दि.३) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८३ वर्षे होते.त्यांच्या पश्चात म्हात्रे कुटुंबीय असा मोठा परिवार आहे.त्यांच्या अंत्ययात्रेत पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते,ज्येष्ठ नागरिक, मान्यवर, ग्रामस्थ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांचे दशक्रिया विधी रविवार (दि.१२) रोजी क्षेत्र माणकेश्वर (केगाव) येथे होणार असून उत्तर कार्य मंगळवारी (दि.१४) राहत्या घरी रानवड येथे होणार आहेत.



# जंगलातील विहिरी फॉरेस्ट गार्डनसाठी वरदान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात असलेल्या जंगलभागात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक झरे आहेत. त्याचवेळी ब्रिटिशकाळापासून विहिरी देखील आहेत. त्यातील अमन लॉज भागातील विहीर तेथील फॉरेस्ट गार्डनसाठी मदतगार ठरत आहे.



माथेरान हे डोंगराच्या माथ्यावर वसलेले थंड हवेचे ठिकाण आहे.या शहरातील मोठ्या प्रमाणात झाडे असून त्या झाडांमुळे पर्यटक थंड हवेचा आस्वाद घेण्यासाठी येत असतात.त्यात माथेरान हे वन जमिनीवर बसले असल्याने वन विभागाची जबाबदारी देखील मोठी आहे.त्यामुळे वन विभागाकडून जंगल राखण्याचे आणि जंगलाचे संवर्धन करण्याचे काम करण्यावर भर दिला जात असतो.त्याच जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात नैसर्गिक झरे आहेत आणि त्यामुळे जंगलात असंख्य ठिकाणी पाण्याचे सोय होत शकते. मात्र माथेरानमध्ये खोदकाम करायला बंदी असल्याने नव्याने विहिरी किंवा लहान धरण बांधता येत नाहीत.परंतु ब्रिटिश काळापासून माथेरानचे जंगल भागात, प्रामुख्याने बंगलो भागात विहिरी बांधून ठेवल्या गेल्या होत्या. त्या विहिरीमधील पाणी आजही वापरले जात असून वन अमन लॉज स्थानकाच्या परिसरात असलेल्या विहिरीचे पाणी वन विभागाकडून वापरात येत आहे.

माथेरानमध्ये वनविभागाचे गार्डन असून या काही एकरामध्ये असलेल्या गार्डनमध्ये असलेल्या झाडांना पाण्याचा पुरवठा हा वन विभाग यांच्याकडून विहिरीमधील पाणी उचलून त्याद्वारे केला जातो. त्या विहिरीमध्ये चांगला पाणी साठा असल्याने विहिरी मधील पाण्यात वीज पंप टाकण्यात आला आहे. त्या पंपाद्वारे पाणी हे तेथून फॉरेस्ट गार्डनमध्ये नेले जाते. फॉरेस्ट गार्डनमधील झाडांना ते पाणी त्यांचे संवर्धन करण्यासाठी घातले जाते. ब्रिटिश काळापासून असलेल्या त्या विहिरीमुळे माथेरानचे अमन लॉज भागात असलेले फॉरेस्ट गार्डन हे महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळाच्या रिसॉर्टमध्ये आलेल्या पर्यटकांसाठी पर्वणी ठरत आहे. वनविभागाचे वन क्षेत्रपाल उमेश जंगम आणि वन पाल राजवर्धन आडे यांच्या कडून फॉरेस्ट गार्डनची देखरेख ठेवली जात आहे.या गार्डनला पुन्हा सुवर्ण काळ मिळवून देण्यासाठी वन विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत.

# पुलाला झाडाझुडपांचा विळखा

**। कोर्लई । वार्ताहर।**

अलिबाग-मुरूड रस्त्यावर मजगांवमध्ये अंदाजे ५० वर्षे जुने असलेल्या पुलाला गेल्या अनेक महिन्यांपासून झाडाझुडपांचा विळखा असून याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षा बाबत नाराजी व्यक्त होत आहे.



## सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

मुरूड जंजिरा पर्यटनात अलिबाग-मुरूड रस्त्यावर असलेल्या या पुलावरून शनिवार रविवार तसेच सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या पुलाला गेल्या अनेक महिन्यांपासून झाडाझुडपांचा असलेला विळखा हटविण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.अशी मागणी जोर धरीत आहे.

# संस्कृतीबरोबर ‘संस्कृत’ भाषा टिकवा: सुहास मराठे

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

परदेशात संस्कृत भाषेला किती महत्त्व आहे तसेच परदेशीयन संस्कृत शिकून आपल्याकडे शिकवायला आल्यावर फॉरेन रिटर्न म्हणून आपण महत्व देतो व त्यांचे कौतुक करतो. पण जे खरतर आपल आहे. हे आपण समजुन घेऊन शिकल पाहिजे.त्याची सुरूवात स्वाती चक्रदेव यांनी छानच केली त्याचा विस्तार झाला पाहिजे ही अपेक्षा व्यक्त करून आपल्या संस्कृती बरोबर संस्कृत भाषा टिकली पाहिजे तीचा वापर केला पाहिजे असे प्रतिपादन सुहास मराठे यांनी केले.



देववाणी,संस्कृत भाषा हिचे संवर्धन करण्यासाठी व घराघरात ती पोहचून व्यवहारात यावी या उद्देशाने संस्कृत भारती या संस्था देशात व परदेशात असे वर्ग घेण्याच काम खुप वर्ष करत असून पेणमध्ये तीन वर्षांपासून वर्ग सुरू असून पुर्णपणे मोफत २५ एप्रिल ते ४ मे या १० दिवसाच्या कालावधीत रोज संध्याकाळी ६ ते ८ या दोन तासात शिक्षक सामाजिक सेवा समजून काम करत होते संभाषण शिक्षणाद्वारे संस्कृत विषयाची ओळख वही, पेन, पुरस्काराशिवाय शिक्षक छान करुन देत. संस्कृत विषयाचे पूर्व ज्ञान नसले तरी त्याची आवड संभाषण शिक्षणाद्वारे निर्माण होते. पेणमधील वर्गात एकुण १५ ते १६ विद्यार्थी नियमित हा मोफत वर्गात हजर होते. स्वाती चक्रदेव यांनी मुख्यशिक्षिका म्हणुन काम बघितले. त्यांना प्रज्ञा साळुंखे, सुप्रीया मराठे , तनुजा आकुत यांनी मदत केली. समारोप प्रसंगी सुहास मराठे अध्यक्ष म्हणुन लाभले. सुत्रसंचालनाचे काम नेहा निमण यांनी संस्कृतमधुन केले.विषेश म्हणजे या वर्गात त्या १ विद्यार्थी होत्या.दुबई निवासी सुजाता मालशे ज्या परदेशात संस्कृत भारतीच काम करतात.तसेच देववाणीच वर्ग व परीक्षा घेतात. त्यांच्या हस्ते पेणमधील प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रकांचे वाटप करण्यात आले.

प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थ्यांनी संस्कृतमध्ये विविध कार्यक्रम सादर केले. दहा दिवसात छान अनुभव शिक्षण मिळाल्याच मत व स्वाती चक्रदेव यांचे कौतुक विद्यार्थी, पालक करत होते. समारोप प्रसंगी सुमारे ५० ते ६० संस्कृत प्रेमी उपस्थीत होते. यावेळी डॉ. अशोक भोईर, विश्व हिंदु परीषद विभाग मंत्री उत्तम चक्रदेव, भार्गवी धर्माधिकारी उपस्थित होते.

# सागरगड महासंघाचे शेतकरी करणार बांबु लागवड

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शिवडी ते न्हावा शेवा सागरी सेतू सुरू झाला आहे. अलिबागकरांची बऱ्याच वर्षाची प्रतिक्षा संपली असून रेवस करंजा पुलाच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे मुंबईजवळ येणार आहे. अलिबाग तालुक्यात तिसरी मुंबई होणार इमारती उभ्या राहणार इमारत बांधकामात बांबुचा वापर होतो. त्यादृष्टीने सागरगड शेतकरी महासंघ अलिबागचे शेतकरी बांबु लागवड करणार असल्याची माहीती महासंघाचे अध्यक्ष विजय चवरकर यांनी दिली.

महासंघातील शेतकरी भात लागवड करतात. त्याच बरोबर मोठ्या प्रमाणावर भाजी पाला पिकवतात. परंतु भाजीपाला पिकांवर रोगाचे प्रमाण वाढले आहे. त्यातच कमी भावाचा फटका बसतोच. रोगाचे प्रमाण अधिक आहे. ऐन उत्पन्नाच्या वेळी रोगाचा प्रार्दुभाव होतो. शेतकऱ्यांचे आथिक नुकसान होते. त्यामुळे उत्पनाच्या दृष्टीने वेगवेगळे पर्याय शेतकरी शोधत आहे.

पाण्याचा विचार करता बांबुला पाणी लागत नाही. कुंपणाच्याकडेने बांबु लागवड करता येते. मोठ्या प्रमाणात लागवड झाल्यास एकत्र माल पाठवता येईल. बांबुचा बहुउद्देशिय वापर होतो मागणी चांगली आहे. मांडगा, धोपील, मेसा या जाती आहेत. वनविभागाकडुन मिळणारी बांबु लागवड गुतांगुतीची आहे. सुटसुटीत सहज तोडता येणाऱ्या मांडगा, धोपील, मेस अशा बांबुना शेतकरी अधिक पसंती देतात, असे विजय चवरकर म्हणाले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **चेंबूर पूर्व मुंबई येथे स्टेशन जवळ** ८६६ स्क्वेअर फूट कारपेट बालकनी सह १ कारपार्किंग नवीन टॉवर ॲमेनीटी सह ताबा ३ महिन्यात मिळणार १० वा मजला नवीन कॉम्प्लेक्स मध्ये फ्लॅट विकणे आहे.
मोबाईल : ९८२१२११४८०/९५७७२१६४९९
- **अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये** कामासाठी माणसे पाहिजेत. Receptions-Housekeeping-waiter-Helper-Cook etc. संपर्क- 8208459424/9323152990
Email. csskshrisnkar@gmail.com
- **शिवाजी नगर चेंढरे येथे ६.७० गुंठे** बिनशेती प्लॉट इमारतीकरिता विकणे आहे. संपर्क ९२२६८४७०७७
- **‘इंद्रप्रस्थ’ गोंधळपाडा येथे सफाईकामगार** त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण-इंद्रप्रस्थ, गांवदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क - ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४
- **Alibag at Kihim Village**, near Chondi Naka, Fully furnished 2BHK Row House Bungalow plus terrace & 1 parking with furniture and white goods ready to move in 1275 B.U.A. for lease @ 50,000 per month. Owner 9820616410
- **Shop 600 sq.ft**. (300 sq.ft. Ground + 300 sq.ft. Mezzanine having full height) with toilet for lease at Mumbai 9, main road facing. Newly furnished ready to move with 24*7 operations. Owner 9820616410

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जलजीवनमिशनमुळे रस्त्यांची वाट

*। नेरळ । प्रतिनिधी ।*

***हर घर जल अशी संकल्पना असलेल्या जलजीवन मिशन योजनेतून असंख्य नळपाणी योजना राबविली आहे.तालुक्यात तब्बल १२१ नळपाणी योजनांची कामे जलजीवन मिशन मधून सुरु आहेत. त्या नळपाणी योजनांसाठी तालुक्यात प्रत्येक गावात रस्त्याच्या बाजूला जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदले आहेत. जलवाहिन्या टाकून अनेक महिने उलटले तरी रस्त्यावरील खड्डे दुरुस्त करण्याचे आणि रस्त्यांची सुधारणा करण्याचे काम जलजीवन मिशन राबविणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना यांच्याकडून झालेले नाही.दरम्यान, गावोगावी रस्ते खोदलेली असल्याने सर्वत्र चांगले रस्ते मातीचे बनून गावातील रस्ते मातीमोल झाले आहेत.***



*कर्जत तालुक्यातील गाव जोडणाऱ्या आणि मुख्य रस्त्यांची महत्वाची कामे मागील तीन वर्षात वेगाने झाली आहेत. मात्र २०२३ मध्ये कर्जत तालुक्यात जलजीवन मिशन आले आणि कर्जत तालुक्यातील रस्ते पूर्वीपेक्षा खराब बनविले गेले आहेत. तालुक्यातील बहुतेक सर्व गावात जलजीवन मिशनमधील नळपाणी योजनांची कामे सुरु आहेत. तालुक्यातील १२१ नळपाणी योजनांची कामे सुरु असून २०० हुन अधिक गावे आणि आदिवासी वाड्यांमध्ये या नळपाणी योजना राबविल्या जात आहेत.जलजीवन मिशन मधील नळपाणी योजनांसाठी गावागावातील रस्त्यांची पुरती धूळधाण ठेकेदारांनी केली आहे. जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदण्यात आले आणि त्यानांतर ते रस्ते पुन्हा दुरुस्त करून देण्याची जबाबदारी असताना देखील ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेच्या अधिकारी वर्गाच्या दुर्लक्षपणामुळे कर्जत तालुक्यातील रस्ते हे खोदून ठेवले होते ते आजही आहेत.*

*तालुक्याच्या प्रत्येक गावात रस्त्यांची अशीच अवस्था असून जलवाहिन्या टाकण्यासाठी मुख्य रस्त्यांच्या बाजूने देखील खोदकाम केले आहे. त्या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्याची मालकी असलेल्या रस्त्यावर कोणतीही परवानगी ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा किंवा जलजीवन मिशन कडून घेण्यात आलेली नाही. ग्रामीण भागातील रस्ते खोदल्यानंतर ते पुन्हा दुरूस्त करण्यासाठी योजनेमध्ये निधी राखून ठेवलेला असतो. मात्र त्यातून देखील रस्त्यांची दुरुस्ती ठेकेदाराकडून होत नाही. रस्ते खोदायची आणि त्यात जलवाहिन्या टाकायच्या आणि नंतर माती टाकून रस्ते असेच ठेवून द्यायचे असे प्रकार तालुक्यात घडले आहेत. सिमेंट कॉंक्रीट आणि पेव्हर ब्लॉक तसेच डांबरी रस्त्याची अशी अवस्था जलजीवन मिशन मधून जलवाहिन्या टाकताना झाली आहे. कर्जत तालुक्यातील नेरल कशेले रस्त्याचे काम पूर्ण झाले असून पाईपलाईनसाठी रस्त्याची साईटपट्टी खोदण्यात आली आहे. त्यामुळे वाहनचालकांना त्याचा त्रासदेखील होत आहे.*

> ***नळपाणी योजना राबविताना जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदावे लागले आहेत. त्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे आदेश संबंधित ठेकेदारांना देण्यात आले आहेत.***
> ***-अनिल मेटकरी. उप अभियंता***

# निजामपुरात जनतेच्या तोंडचे पाणी पळाले

## तिसऱ्या योजनेच्या कामाला मुहूर्त सापडेना

## पूर्वीची योजना कोरडी, सुधारित योजना अपूर्ण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर निजामपूर ग्रामपंचायतीकडून होणारा पाणीपुरवठा गेले महिनाभरापासून कमी प्रमाणात सोडले जात असून, अनेक वेळा कधी तांत्रिक बिघाड तर कधी पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत पाणी नसल्याने निजामपूरकरांना निमूटपणे पाणीटंचाईचे चटके सहन करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. त्यामुळे निजामपुरात जनतेच्या तोंडचे पाणी पळाले असल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांतून व्यक्त होत आहे.

निजामपूरला ४० वर्षांपूर्वी काळ नदीवरील विरोधा येथील विहिरीतून पाणीपुरवठा केला जात होता. वाढत्या शहरीकरणाबरोबरच नागरिकीकरण ही मोठ्या झपाट्याने वाढत असल्याने पाण्याचाही प्रश्न अधिक गंभीर होत चालला आहे. या शहराला मुबलक व स्वच्छ पाणी मिळावे म्हणून अनेक योजना राबविल्या. सध्या ही योजना कोरडी पडली. तर सुधारित पाणी योजना अर्धवट स्थितीत आहे. त्याचबरोबर नव्याने विळे-भागाड एमआयडीसीप्रमाणे रवाळजे धरणाच्या पाण्यावर नवीन २८ कोटी रुपयांची योजना मंजूर केली. या योजनेचे सप्टेंबर महिन्यात भूमीपूजन करण्यात आले. मात्र, अद्यापही या योजनेचे काम सुरु झाले नसल्याने एक ना धड, भाराभर चिंध्या अशी स्थिती झाली आहे.

दरम्यान, काळ नदीवर उभारलेला विरोधा येथील बंधारा एक महिन्यापूर्वी कोरडा पडला असून, याच नदीवर असणारे कोशिंबळे धरणही कोरडे पडल्याने निजामपूर व परिसरातील अनेक गावे वाड्यातील नागरिकांची पाण्यासाठी भटकंती सुरु झाली आहे. ही काळ नदी पूर्ण कोरडी पडल्याने या पाणीटंचाईशी सामना कसा करावयाचा हा मोठा प्रश्न उभारला आहे.

सध्या पहूर येथील धरणाचे पाणी काळ नदी पात्रात सोडले असून, ते पाणी विहिरीत येईपर्यंत नागरिकांना पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. माणगाव तालुक्यातील निजामपूर येथे सुमारे १६ हजार लोकसंख्या असून, गेल्या अनेक वर्षांपासून काळ नदीवर विंधनविहीर खोदून तेथून हाऊसपंपाद्वारे साठवण टाकीत पाणी सोडले जाते. त्या साठवण टाकीतून निजामपूर व परिसरातील गावांना पाणीपुरवठा केला जातो. याच काळ नदीवर ४५ वर्षांपूर्वी कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा बांधला होता. या काळ नदीचे पाणी बंधाऱ्यात साठवले जात होते. त्यामुळे नागरिकांना येथील धरणाच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत होता. या बंधाऱ्याची अनेक वर्षे दुरूस्ती न केल्याने हे पाणी वाहून गेले. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून निजामपूरकरांच्या पदरी पाणीटंचाई पडत आहे. निजामपूर व परिसरातील चार महसूल गावे १० वाड्या व निजामपूर बाजारपेठ असी मिळून १६ हजार लोकसंख्या आहे.

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहीर सूचना

याद्वारे जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की, आम्ही, याखाली लिहलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषत: वर्णन करण्यात आलेल्या जिल्हा रायगड, तालुका कर्जत येथील पाचखडकवाडी गावामध्ये स्थित शेतजमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंडाच्या शिर्षकाबाबत (एकत्रितपणे, "**जमीन**") अंबे भवानी मंदीराजवळ, ९५, भिसेगाव, कर्जत, रायगड ४१०२०१ हा पत्ता असणारे (i) बेबी रघुनाथ पिंगळे, (ii) अस्मिता संकेत वारे, (iii) राहुल रघुनाथ पिंगळे आणि (iv) अर्चना तुषार लांडगे ("**मालक**") यांच्या अधिकाराची, शिर्षकाची, हितसंबंधाची आणि हिस्स्याची चौकशी करीत आहोत.

सर्व व्यक्तींचे जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागा विरोधात/वर/संदर्भात मालकांचे हक्क, शिर्षक आणि हितसंबंधाबाबत वारसा, गहाणवट, विक्री, विक्री करार, विकास हक्क प्रदान करुन, हस्तांतरण, नियुक्ती, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, परवाना, समभाग, धारणाधिकार, भार, विश्वस्त, सुलभता, मार्गाचा अधिकार, भेट, संपादन, मागणी, कोणत्याही न्यासाअंतर्गत कोणताही बोजा किंवा फ़ायदेशीर हक्क/हित, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा कोणताही करार किंवा इतर प्रवृत्ती किंवा कोणत्याही खटल्याअंतर्गत कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने पारित केलेला डिक्री, मनाई आदेश किंवा जप्ती किंवा निवाडा, खटला, प्रलंबित दावे, कोणत्याही निर्णायक प्राधिकरणाचा डिक्री किंवा आदेश, विनिमय, विभाजन, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र, वसिहत, एफ़एसआय, कुळ, विकसन अधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, ताबा, वितरण किंवा अन्यथा कसेही दावा आणि/किंवा मागणी (एकत्रितपणे, "**दावे**") असल्यास त्यांनी याद्वारे खाली स्वाक्षरी केलेल्यांना खैतान ॲण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, टॉवर-१, १३वा मजला, सेनापति बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००१३ येथे तसेच Yigal.gabriel@khaitanco.com (श्री. यिगाल गॅब्रिएल यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल वर सहाय्यक कागदापत्रांच्या प्रतीसह, सदर प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालवधीत लेखी कळवणे आवश्यक आहे, अन्यथा, असे कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत असे गृहीत धरले जाईल आणि जर असे दावे असतील तर ते दावे माफ केले गेले आणि/किंवा सोडुन दिले आहेत असे मानले जाईल आणि ते दावे मालकांवर बंधनकारक नाहीत असे समजले जाईल.

**अनुसूची**

जिल्हा रायगड, तालुका कर्जत येथील पाचखडकवाडी गावामध्ये स्थित सर्व्हे क्रमांक १०/६ए धारक मोजमापीत ३१,६०० चौरस मिटर्स किंवा जवळपास असलेल्या शेतजमिनीचा भाग असलेली तसेच भुखंड क्रमांक १२ धारक मोजमापीत २,००० चौरस मिटर्स आणि भुखंड क्रमांक १३ धारक मोजमापीत २,००० चौरस मिटर्स, एकूण ४,००० चौरस मिटर्स किंवा त्या जवळपास असलेली जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड.

आज दिनांक ७ मे २०२४

सही/-
खैतान अँड कंपनी करीता

सही/-
यिगाल गॅब्रीयल, भागीदार


## अडीच लाखांचे कोकेन हस्तगत

**पनवेल** : खारघर पोलिसांनी एका विदेशी नागरिकाला ताब्यात घेवून त्याच्याकडून जवळपास अडीच लाख रुपये किंमतीचे कोकेन हस्तगत केले आहे. खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि राजीव शेजवळ यांना खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ परिसरात एक विदेशी इसम नागरिक ड्रग्ज घेवून येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली अतुल आहेर, सहाय्यक पोलीस निरीक्षक यमगर व पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून एका विदेशी इसमाला ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे २२ ग्रॅम कोकेन ज्याची बाजारी किंमत २ लाख २० हजार इतकी आहे. त्यानुसार मव्हनयुकी मुस्सा याला ताब्यात घेतले.

## 'वन्यप्राण्यांसाठी पाण्याचे नियोजन करा'

**। माथेरान । वार्ताहर ।**

ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा सुरू झाला आहे. मनुष्य प्राणी काहींना काही करून स्वतःच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करीत असतो; परंतु जंगलामध्ये राहणाऱ्या वन्यप्राण्यांना मात्र पाण्यासाठी वणवण भटकावे लागते व त्यामध्येच काही टपून बसलेल्या विघ्नघातकी लोकांकडून त्यांची शिकार केली जाते. त्यामुळेच या दिवसांमध्ये वन्य प्राण्यांसाठी जंगलात ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी पाणवठ्यांची व्यवस्था करणे गरजेचे झाले आहे.

मागील काही वर्षांमध्ये माथेरानमध्ये वन्य प्राण्यांची संख्या वाढलेली दिसून येत आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने भेकर, शेकरू रानडुक्कर त्याचप्रमाणे बिबट्याही आढळून आला आहे. या व्यतिरिक्त अनेक पशुपक्षी या दिवसांमध्ये माथेरानमध्ये येत असतात; परंतु त्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अगदी नगण्य आहे.

माथेरानमध्ये अनेक जिवंत झरे आहे; परंतु त्यांची निगा न राखल्या गेल्यामुळे हे पानवठे मे महिन्यापर्यंत कोरडे पडत असतात त्यामुळेच या वन्य प्राण्यांना अनेक वेळा पाहण्यासाठी मानव वस्तीमध्ये प्रवेश करावा लागतो. त्यातच त्यांचा जीवही गेलेला आहे.

या काळामध्ये माथेरानमध्ये अनेक स्थलांतरित पक्षी व प्राणी येत असतात, हा त्यांचा प्रजननाचा काळ असल्याने जंगल परिसरामध्ये पक्ष्यांची किलबिल ऐकू येत असते. म्हणूनच अशा पक्ष्यांनाही पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे.

काही वर्षांपूर्वी वन विभागाकडून पाणी आडवा पाणी जिरवा या अंतर्गत जंगलांमध्ये बंधारे बांधण्यात आले होते. त्यामध्ये पाणीसाठा उन्हाळ्यात आढळून येत असे. परंतु, आता हे सर्व जमीनदोस्त झाल्यामुळे नव्याने जंगलामध्ये पाणवठे निर्माण करण्याची गरज असून, वन विभागाने त्याकडे लक्ष द्यावे, असे येथील स्थानिकांचे म्हणणे आहे.


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने समस्त लोकांना कळविण्यात येते की खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही मे. महिंद्रा लाईफ स्पेस डेव्हलपर्स लिमिटेड यांच्या मालकी वहिवाटीची असून त्यांची सदर मिळकतीचे विक्रीबाबत आमचे अशिलासोबत बोलणी सुरु आहेत. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री विद्यमान मालकांनी दिलेली आहे. तरी सदरच्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही गहाण, दान, लीज, बक्षीस, अन्न वस्त्र, पोटगी, करार, कोर्ट केसेस, वहिवाट इत्यादी कसलाही हक्क व अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आतमध्ये आपलेकडील कागदपत्रांनिशी आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजून आमचे अशिल त्यांचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कळावे ही जाहीर नोटीस.

दिनांक ०४.०५.२०२४

**परिशिष्ट**

तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका अलिबाग येथील गाव मौजे नागाव येथील गट नं. १६८१/७ यांसी अकृषिक क्षेत्र ५५२.५२ चौ. मी. यांसी आकार ५५.२५ अशी चतुःसीमापूर्वक मिळकत

**डांगरे साने असोसिएट्स**
५५, धनंजय, शैलेश सोसायटी,
कर्वेनगर, पुणे ४११०५२
फोन नं. ९८२२६६८७४२, ९९२३१७७०५९.



## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन



१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## तळा नगरपंचायतची प्लास्टिक पिशवी बंदी मोहीम

**। तळा । वार्ताहर ।**




स्वच्छ भारत अभियानांतर्गत व माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत तळा नगरपंचायतीर्फत शहरातील बाजारपेठेत एकेरी प्लास्टिक बंदी नागरिकांमध्ये जनजागृती करून दंडात्मक कारवाईची नोटीस देऊन समज देण्यात आली. ही मोहीम १० एप्रलिपासून राबविण्यात येत आहे.

दरम्यान, पहिली दंडात्मक कारवाई ५०००/- रुपये, दुसरी दंडात्मक कारवाई १०,०००/ - रुपये, तिसरी दंडात्मक कारवाई २५,०००/- रुपये , कलम ३(१)(१) अन्वये ३ महिने कैद असा शासनाचा आदेश असून, दिलेल्या नोटिशीप्रमाणे पालन केल गेले नाहीतर होणाऱ्या कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी नोटीस देण्यात आली आहे. मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. याकामी स्वच्छता निरीक्षक दीपक वडके, लिपिक केतकर व नगरपंचायत कर्मचारी उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे-नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सोमनाथ सुभाष चतुर यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| नागांव ता. अलिबाग | १६४८/३/१/५ | ४.०८.०० | ४०.८० |

वर नमूद क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची बिनशेती जमिन मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तसेच सदर मिळकती मधून इतर मिळकतीत जाणे करीता कोणतीही पायवाट अथवा वहिवाटीचा मार्ग, पाणी जाणेच परंपरागत मार्ग अस्तित्वात नाही. सदर मिळकत गुर चरण पद्धतीची नाही, या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०७/०५/२०२४

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक राजेंद्र महादेव बोडके यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे - गौळवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉं.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५०/१९ | ०-४१-०० हे आर पॉ यापैकी ०-२०-५० हे आर पॉ एवढे क्षेत्र | ०-३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०५/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. राजेश भास्करन, रा. ३०२/बी, भुमी क्लासिक्स को. ऑप. हौ. सोसा. सबकुछ मार्केट समोर, मालाड पश्चिम मुंबई ४०००६४ यांस खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा साठेकरार त्या मिळकतीचे मालक सुनिता नरहरी कडवे वगैरे यांनी करुन दिलेला आहे. अशी परिस्थिती असताना सदर मिळकतीची बेकायदेशीरपणे आमचे अशिलांची फसवणूक करुन मिळकतीचे मालक सुनिता नरहरी कडवे वगैरे हे बेकायदेशीरपणे मिळकतींमध्ये त्रयस्थ ईसमांचे हक्क हितसंबंध तयार करण्याचे तयारीत आहेत. अशी खात्रीलायक बातमी आमचे अशिलांस समजलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सारळ, ता. अलिबाग | ३०२ | ०-६४-६० पो.ख. ०-०२-०० ०-६६-६० | १६-५१ |

तरी मिळकतीसंदर्भात सुनिता नरहरी कडवे वगैरे यांनी अथवा तत्सम इतर कोणीही व्यक्तींनी वर नमूद मिळकतींसंदर्भात कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार करू नये. तसा कुठलाही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष केल्यास व आमचे अशिलांचे हक्कास कमीपणा येईल असा व्यवहार केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल. व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser ) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तरी कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्टकारवाईस संबंधीत ईसम जबाबदार राहतील हे कळावे.

अलिबाग,
दि. ०६-०५-२०२४.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु बिल्डींग, राम मंदिर शेजारी
ब्राम्हणआळी अलिबाग


## सेवानिवृत्त सैनिकाला दोन लाखांची मदत

**पनवेल** : सेवानिवृत्त सैनिकांच्या कुटुंबियांना मदतीचा हात म्हणून २ लाखाची आर्थिक मदत देण्यात आली आहे. सुनील कुमार, भारतीय नौदलातील निवृत्त सैनिक, प्रमुख पीटीआय. गेल्या एक वर्षापासून कॅन्सरशी झुंज देत असलेल्या यांनी नुकताच अखेरचा श्वास घेतला. त्याने आपल्या कुटुंबाला मागे सोडले. अखिल भारतीय पीटीआय परिवार, पनवेल, महाराष्ट्र. या संघाचे पदाधिकारी कुटुंबाशी बोलल्यानंतर परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी या कुटुंबाला सुमारे १.६२ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031128**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-22/ 2024-2025.**<br>RFx E-tender for work of stub strengthening of various 220kV & 100kV Lines under EHV Lines S/Dn Panvel under EHV (O&M) Division.<br>**Tender amount Rs. 9,57,464/-,**<br>**EMD amount Rs. 9,575/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **07.05.2024, 18:00 Hrs. to 14.05.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 14.05.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **15.05.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



### जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळवली, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची शेतजमिन मिळकत, श्री. दत्तात्रेय हरिश्चंद्र महालकर राहणार आगरीपाडा, कोर्लई, ता. मुरूड, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी, ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तळवली ता. मुरूड | १९० | ०-२१-३० ०-००-३० पो.ख. ०-२१-६० एकूण | ५-४० |

अलिबाग,
दिनांक : ०६/०५/२०२४.

सही/
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री. दिलीप अनंत जोग रा. साईलिला अपार्टमेंट, बी विंग, दुसरा मजला, पसायदान बंगला, रानवडे हॉस्पीटल जवळ, चेंढरे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विनायक राजाराम रानवडे, रा. सेंटमेरी शाळेसमोर, चेंढरे, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून काय विकत घेणेबाबत दि. २६/११/२०२३ रोजी अंतिम व्यवहार ठरविलेला आहे व त्यापोटी बयाणा ही आमचे अशिलांनी विदयमान मालकांना दिलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे. सदरचा व्यवहार ठरल्यानंतर आमचे अशिलांनी सदर मिळकतीची साफसफाई करुन सदर मिळकतीची सरकारी मोजणीही त्यांच्या खर्चाने करुन घेतलेली आहे.

**-: मिळकतींचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| कामथ ता. अलिबाग | ३३८/१ | २१-००-०० | २१० |
| | ३३८/१/२ | ३-००-०० | ३०-०० |
| | ३३८/२ | ३-००-०० | ३०-०० |

सदर मिळकतीबाबत आमचे अशिलांसोबत विदयमान मालकांनी आमचे अशिलांस सदर मिळकत विकत देणेबाबत तोंडी अंतिम व्यवहार ठरविला असूनही आता विदयमान श्री. विनायक राजाराम रानवडे हे आमचे अशिलांच्या झालेल्या व्यवहाराला बगल देवून सदर मिळकतीमध्ये त्रयस्थ ईसमांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याच्या तयारीत आहेत असे आमचे अशिलांस खात्रीलायकरित्या समजले आहे. त्याबाबत आमचे अशिलांनी वेगळी नोटीसही कराराची विशेष पुर्तता करुन मिळणेकरीता श्री. विनायक रानवडे यांना पाठविण्याची तजवीज केलेली आहे. तरी आमचे अशिलांचा श्री. विनायक राजाराम रानवडे यांचेसोबत झालेला व्यवहार लक्षात घेवून सदर मिळकतींसंदर्भात तसा कुठलाही व्यवहार आमचे अशिलांचे अपरोक्ष कोणीही केल्यास त्या व्यवहारास आमच्या अशिलांची सक्त हरकत असेल. व तसे केल्यास सदर व्यक्ती सदर मिळकतीचे प्रामाणिक खरेदीदार (Bonafide Purchaser ) होणार नाहीत. तसेच अशा प्रकारचा कोणताही व्यवहार आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. सदर प्रकारचा खरेदी-विक्रीचा व्यवहार केल्यास भविष्यातील कोर्टकारवाईस संबंधीत ईसम जबाबदार राहतील हे कळावे.

अलिबाग,
दि. ०६-०५-२०२४.

सही/-
**ॲड.आर.बी.कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.



### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे टेंभरे, ता.कर्जत जि.रायगड**

| मालकाने नाव | स.नं./हि.नं | एकूण क्षेत्र हे-आर-पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| श्री.एकनाथ बाळु पाटील | ३३/४ | ००-२२-०० | ०-०० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कुळमुखत्यारपत्र, बयाना, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि.०७/०५/२०२४

**ॲड.संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता-बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९४०३६४७९५३



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे शेडसई, ता.रोहा, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री श्रीकांत रघुनाथ खानविलकर यांच्याकडून विकत घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे शेडसई, ता.रोहा, जि.रायगड येथील-**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकारणी |
|---|---|---|
| १४३ | ०-२३-१० पो.ख. ०-००-८० ०-२३-९० | ५-९३ |

येणेप्रमाणे वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक :-०७/०५/२०२४

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
गुरुकृपा, महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

निवडक

## शोएब करणार पुनरागमन?

**लाहोर :** पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमवरील सामन्यादरम्यान शोएब अख्तरही मैदानात होता. स्टेडियममध्ये उपस्थित प्रेक्षकांनी शोएबच्या घोषणा देण्यास सुरुवात केली, त्यानंतर शोएब अख्तरने असे काही ट्विट केले ज्यामुळे चाहते हताश झाले. शोएब अख्तरने ट्विटमध्ये लिहिले,मला तुमच्या सर्वांसाठी गोलंदाजी करण्यासाठी पुन्हा मैदानात जायचे होते. मला खूप आनंद झाला.चाहत्यांनीही त्याला मैदानावर पुन्हा बघायला आवडेल, असे सांगितले.

## अकोलाचा निसटता विजय

**अकोला :** जिल्हा हौशी क्रिकेट संघटना, अकोला व अकोला क्रिकेट क्लबच्या संयुक्त विद्यमाने येथे आयोजित व्हीसीए टी-२० स्पर्धेत अकोला संघाने भंडारा पराभूत केले.अकोला क्रिकेट क्लब मैदानावर खेळविल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात भंडारा संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत निर्धारित २० षटकांमध्ये पाच गड्यांच्या मोबदल्यात १५८ धावा केल्या. धावांचा पाठलाग करताना अकोला संघाने १९.२ षटकांमध्ये ९ गडी गमावून केवळ १६२ धावा करून अवघ्या एका गड्याने विजय मिळविला.

## सट्टा लावणारा गजाआड

**नागपूर :** रॉयल चॅलेंज बंगळुर विरुद्ध गुजरात टायटन्स या आयपीएल मॅचवर सट्टा लावणाऱ्या आरोपीला गजाआड करून ५९ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पवन मंगर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी द्वारकानगरी चकोलेवाडी येथे धाड टाकली असता आरोपी पवन हा त्याचा पाहिजे असलेला साथीदार राकेश नरुले याच्या मदतीने आयपीएल क्रिकेट लाईव्ह मॅचवर मोबाईलवरून सट्टा लावताना आढळला.

## हॉकीचा कनिष्ठ संघ जाहीर

**नवी दिल्ली :** हॉकी इंडियाने युरोप दौऱ्यासाठी भारतीय पुरुष कनिष्ठ हॉकी संघाची घोषणा केली आहे. बचावात्मक खेळाडू रोहितच्या नेतृत्वाखाली संघ २० ते २९ मे या कालावधीत युरोप दौऱ्यावर पाच सामने खेळणार आहे. या २० सदस्यीय संघात शारदानंद तिवारीला उपकर्णधारपद देण्यात आले आहे. भारतीय संघ बेल्जियम, जर्मनी आणि नेदरलँड्समध्ये पाच सामने खेळणार आहे. भारत या दौऱ्याची सुरुवात अँटवर्पमध्ये बेल्जियमविरुद्ध करेल. त्यानंतर ब्रेडा, नेदरलँड्स येथे संघ पुन्हा बेल्जियमशी भिडणार आहे.

## व्हेरॉक कप क्रिकेट स्पर्धा

**मुंबई :** अद्विका जाधवच्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमी 'अ'संघाने बारा वर्षांखालील गटाच्या व्हेरॉक कप क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम लढतीत आर्यन्स अकादमीवर नऊ गड्यांनी मात केली आणि जेतेपद पटकावले. डीव्हीसीएच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना आर्यन्स संघाचा डाव श्रेयस राठोड आणि स्वराज सातपुते यांच्या अचूक गोलंदाजीसमोर ९२ धावांतच आटोपला. श्रेयश, स्वराज यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.

# महिलांच्या टी-२० विश्वचषकाचे बिगुल वाजले

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

**महिलांच्या टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांसारख्या बलाढ्य संघांचा एकाच गटात समावेश करण्यात आला आहे. बांगलादेशमध्ये ३ ते २० ऑक्टोबरदरम्यान रंगणाऱ्या महिलांच्या टी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक तसेच गटवारी रविवारी जाहीर करण्यात आली.**



बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसिना, भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर आणि बांगलादेशची कौर निगर सुल्ताना यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे वेळापत्रक आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केले.

२००९मध्ये सुरुवात झालेल्या महिलांच्या टी-२० विश्वचषकाचे यंदा नववे पर्व असेल. २०२३मध्ये झालेल्या अखेरच्या टी-२० विश्वचषकात भारताला उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाकडूनच पराभव पत्करावा लागला होता. ढाका आणि सिल्हेट या दोन ठिकाणी सामने खेळवण्यात येणार असून स्पर्धेत यंदाही १० संघांचा समावेश असेल. भारत, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, न्यूझीलंड आणि पात्रता फेरीद्वारे आगेकूच करणारा संघ अ-गटात असेल. ब-गटात इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, बांगलादेश आणि पात्रता फेरीतील दुसरा संघ असे अन्य ५ संघ असतील. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ ४ ऑक्टोबर रोजी न्यूझीलंडविरुद्ध सलामीची लढत खेळेल. मग ६ ऑक्टोबरला त्यांची पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी गाठ पडेल. भारताचे सर्व सामने हे सिल्हेट येथे होतील. १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी उपांत्य फेरीचे सामने होतील, तर २० तारखेला अंतिम लढत रंगेल. बाद फेरीच्या सामन्यांसाठी राखीव दिवसही ठेवण्यात आला आहे.

### भारताचे सामने

४ ऑक्टोबर वि. न्यूझीलंड
६ ऑक्टोबर वि. पाकिस्तान
९ ऑक्टोबर वि. पात्र संघ
१३ ऑक्टोबर वि. ऑस्ट्रेलिया

### स्पर्धेविषयी महत्त्वाचे

* १९ दिवस, २३ सामने, १० संघ.
* प्रत्येक गटात ५ संघांचा समावेश असून एका संघाला ४ सामने खेळावे लागतील.
* गटातील आघाडीचे दोन संघ थेट उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.
* पात्रता फेरीद्वारे आयर्लंड, श्रीलंका, स्कॉटलंड आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यापैकी दोन संघ मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरतील.
* भारताने अद्याप एकदाही टी-२० विश्वचषक जिंकलेला नाही. २०२०मध्ये भारताने अंतिम फेरी गाठली होती.
* ऑस्ट्रेलियाने तब्बल ६, तर इंग्लंड व वेस्ट इंडिजने प्रत्येकी एकदा विश्वचषक उंचावला आहे.

# रायगडचा मुलींचा कनिष्ठ संघ जाहीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने रायगड जिल्ह्याचा ज्युनियर (१९ वर्षांखालील) मुलींचा क्रिकेट संघ जाहीर केला आहे. हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या निमंत्रीत मुलींच्या संघांच्या क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल.

रायगड जिल्ह्याचा ज्युनियर मुलींचा संघ निवडण्यासाठी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे रिलायन्स मैदान लोधिवली येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या निवड चाचणीतून रायगड जिल्ह्याचा मुलांचा संघ निवडण्यात आल. हा संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धेत सहभागी होईल. ही स्पर्धा ९ मे पासून पुणे येथे खेळली जाणार आहे, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

रायगडचा संघात रोशनी पारधी, समुध्दी कांबळे, तनिष्का वार्गे, काजल साळुके, वेदश्री शेळके, आर्या पाटील, कृतिका मुंडे, रूचिता नाचनकर, प्रांजल चिपळूणकर, अंजली गोडसे, समिधा तांडेल, अपर्णा सिंग, सृष्टी भोईर, रूतिका पाटील यांचा समावेश आहे. राखीव मध्ये गायत्री गोडे, गार्गी माने, अनिशा बामणे, वंशिका मोहिते, मनिषा लांबोरे, वेदाई वावेकर यांचा सतावेश आहे. तर प्रशिक्षक व व्यवस्थापक म्हणून मनीषा अडबळ यांची निवड करण्यात आली आहे.

## चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तानमधून

# श्रीलंकेत हलवणार?

### ■ दहशतवादी हल्ल्याच्या धमकीनंतर नेटकऱ्यांनी घेतली मजा

**। मुंबई । वृत्तसंस्था।**

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ सुरू होण्यासाठी फारसे दिवस राहिले नाही. आगामी टी-२० विश्वचषक १ जून ते २९ जून दरम्यान वेस्ट इंडिज आणि यूएसएमध्ये खेळला जाणार आहे. या विश्वचषकाची तयारी जवळपास अंतिम टप्प्यात आली आहे. खरंतर टी-२० विश्वचषकाला पाकिस्तानकडून दहशतवादी हल्ल्याची धमकी मिळाली आहे. यानंतर आता पाकिस्तानची खिल्ली उडवली जात आहे.

उत्तर पाकिस्तानमध्ये असलेल्या आयएस-खोरासानकडून विश्वचषकादरम्यान कॅरेबियन देशांना धोका आहे. दहशतवादी संघटना इस्लामिक स्टेटने टी-२० वर्ल्ड कपसह जगभरातील मोठ्या कार्यक्रमांना लक्ष्य करण्याची धमकी दिली आहे. पुढील वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफी पाकिस्तानमध्ये आयोजित केली जाणार आहे आणि चाहत्यांनी आता चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानकडून हिसकावून घेण्याची मागणी सुरू केली आहे. याशिवाय पाकिस्तानी टीमचा व्हिडिओही व्हायरल होत आहे, ज्यामध्ये टीम पाकिस्तानी सैन्यासोबत ट्रेनिंग करताना दिसत आहे. वेस्ट इंडिज क्रिकेटचे सीईओ जॉनी ग्रेव्ह्स म्हणाले की, आम्ही ज्या शहरांमध्ये विश्वचषकाचे सामने खेळवले जातील तेथील अधिकाऱ्यांशी जवळून काम करत आहोत. विश्वचषकाबाबत कोणताही धोका नाही आणि आम्ही सर्व प्रकारे नियोजन करत आहोत. ज्एवढेच नाही तर सर्व संघांच्या सुरक्षेला आमचे प्राधान्य असल्याचे आश्वासन दिले आहे.

# कुस्तीपटू बजरंग पुनियावर निलंबनाची कारवाई

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।**

**'नाडा'ने अंधारात ठेवल्याचा कुस्ती महासंघाचा आरोप**

राष्ट्रीय चाचणी स्पर्धेत डोपिंग चाचणी करण्यात नकार दिल्याने कुस्तीपटू बजरंग पुनियाला तात्पुरत्या कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहे. राष्ट्रीय उत्तेजक विरोधी संस्थेने (नाडा) या प्रकरणी अंधारात ठेवल्याचा आरोप भारतीय कुस्ती महासंघाने (डब्ल्यूएफआय) केला आहे.

डब्ल्यूएफआय याबाबत जागतिक उत्तेजक द्रव्यसेवनविरोधी संस्थेकडे तक्रार करण्याची शक्यता आहे. बजरंगला २३ एप्रिलला नाडाने तात्पुरते निलंबित केले होते. पुढील शिस्तभंगाची कारवाई टाळण्यासाठी त्याला ७ मेपर्यंत उत्तर पाठविण्यास सांगण्यात आले. बिश्केकमध्ये आशियाई ऑलिम्पिक पात्रता स्पर्धेसाठी पुरुषांच्या राष्ट्रीय संघाची निवड चाचणी १० मार्चला सोनिपत येथे घेण्यात आली.

सामना गमावल्यानंतर बजरंग मूत्राचा नमुना न देताच स्पर्धा ठिकाणाहून निघून गेला. डब्ल्यूएफआयचे अध्यक्ष संजय सिंह यांनी म्हटले आहे की, नाडाने आम्हाला बजरंगवरील कारवाईबाबत कोणतीही सूचना दिलेली नाही, हे आश्चर्यकारक आहे.

# क्रिकेट स्पर्धेत डोंबिवली ड्रीमर्स प्रथम

**। कल्याण । वृत्तसंस्था।**

ठाणे जिल्ह्यात प्रथमच महिलांकडून, महिलांसाठी भव्य क्रिकेटसामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. टिटवाळ्यातील मुली, महिलांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाता यावे तसेच या क्षेत्रात ही आपले करियर करता यावे या प्रेरणेतून स्वराज्य रणरागिणी संस्थेच्या अध्यक्षा सुप्रिया आचरेकर यांनी हे क्रिकेट सामान्यांचे आयोजन करण्यात आले.

व्यवस्थापक टीम मध्ये चारुशीला मंचरक, समृध्दी सावंत, शीतल खोकले, अस्मिता शाह, मालिनी मगर, अर्चना जोशी, उज्वला भोईर, वैशाली मालुसरे, किशोर मगर, संदीप वराडकर, शेखर जोशी, मिलिंद सावंत, उमेश शाह, लक्ष्मण मंचरकर, सिध्देश सावंत आणि संदीप आचरेकर यांनी व्यवस्थापक म्हणून चोख भूमिका बजावली. यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.

ठाणे जिल्ह्यातून महिला क्रिकेट सामन्यासाठी नोंदणी येत होत्या. महिलांच्या ९ टीम घेऊन ११ सामने दिवसभर भरविण्यात आले. महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी अण्णा तरे, सुहास कांबळे, ह्युमन केअरचे अध्यक्ष कमलेश नागरे, पोलीस महिला दक्षता कमिटी टिटवाळा हिराताई कांबळे, तृप्ती गायकवाड, प्रमोद नांदगावकर, वैदेही नांदगावकर, २०२२ फॅशन शो विजेती वैदेही खिस्मतराव, राजेश दीक्षित आदी मान्यवर उपस्थित होते.

निवेदक तुषार वैद्य, मनीषा अग्निहोत्री, पंच अभिजित कडव, संदीप वराडकर, राहुल जबडे आणि संदीप आचरेकर यांनी आपली जबाबदारी चोख बजावली.

स्वराज्य रणरागिणी महिला संस्था आयोजित महिला क्रिकेट २०२४ मध्ये ९ संघामधून डोंबिवली ड्रीमर्स संघ प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. त्यांना चषक व ११ हजार १ रुपये रोख देऊन गौरवण्यात आले. द्वितीय पारितोषिकाचे मानकरी ठरला. मनिकर्णिका संघ. त्यांना चषक व ६ हजार १ रूपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. तृतीय पारितोषिक विजेत्या शिवकन्या संघाला रोख रक्कम २ हजार ५०१ रूपये पारितोषिक देण्यात आले. सर्व सहभागी महिला खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

# मध्यप्रदेशकडून महाराष्ट्राचा पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसस्स्था ।**

राष्ट्रीय महिला हॉकी लीग २०२४ फेज १ मध्ये हरियाणाने रोम हर्षक लढतीत बंगालचा ४-३ असा पराभव केला. तर मध्यप्रदेशने महाराष्ट्राचा २-१ ने पराभव केला. दिवसाच्या सुरुवातीच्या सामन्यात बंगालचा संघ काहीच वेळातच आघाडी घेण्यास यशस्वी झाला आणि सिलबिया नागने खेळाच्या सुरुवातीला पेनल्टी कॉर्नरला गोल मध्ये बदलले त्यांनतर सेलेस्टीना होरो दुसऱ्या क्वार्टरमध्ये पेनल्टी कॉर्नरचे गोल मध्ये रूपांतरण करत आघाडी दुप्पट केली.

दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात मध्यप्रदेश कडून महाराष्ट्राचा २-१ असा पराभव झाला. पहिल्या हाफ मध्ये एकही गोल झाला नाही. तर तिसऱ्या क्वाटरमध्ये मध्यप्रदेशच्या अचल साहू ने ४५ व्या मिनिटात मैदानावर गोल करत आघाडी घेतली. प्रत्युत्तर देत महाराष्ट्राची कर्णधार अश्विनी कोळेकर हिने ५० व्या मिनिटात शेवटच्या क्वार्टर मध्ये गोल करत गुणसंख्या बरोबर केली. मध्यप्रदेशाच्या स्वातीने ५४ व्या मिनिटात गोल करून मध्यप्रदेशाला आघाडी मिळवून देत सामना जिंकला.

# एल्बोबॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्र प्रथम

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

नुकत्याच गोवा पणजी येथे एल्बोबॉक्सिंग महासंघ भारत यांच्या विद्यमाने राष्ट्रीय एल्बोबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सर्वात जास्त पदके महाराष्ट्राने पटकावली. त्यामुळे अजिंक्यपद महाराष्ट्राला देण्यात आले.



या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील युनायटेड कराटे असोसिएशनचे विद्यार्थी महाराष्ट्र संघार्तन खेळले. यामध्ये पार्थ शहासने सुवर्ण पदक, रुद्रेश पाटील सुवर्ण पदक, मोहीत कोठेकर सुवर्ण पदक, गौरव म्हात्रे सुवर्ण पदक, सलोनी सावंत सुवर्ण पदक, रितुल म्हात्रे सुवर्ण पदक, हर्षाली पेणकर सुवर्ण पदक, प्राजक्ता तेटमे सुवर्ण पदक, तेजश्री आयवळे सुवर्ण पदक, तसेच स्मित म्हात्रे रौप्य पदक, रितेष पवार याने कांस्य पदक पटकावले.

या सर्व खेळाडुंना रविना म्हात्रे यांनी कोचिंग केली. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून नऊ राज्यातील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे उद्‌घाटन गोवा प्रदेश युथ काँग्रेसचे अध्यक्ष रॉड्रेस अंद्रेस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय एल्बोबॉक्सिंग महासंघ भारताचे अध्यक्ष सुरेश कोळी, राष्ट्रीय एल्बोबॉक्सिंगचे उपाध्यक्ष रविंद्र म्हात्रे, राष्ट्रीय एल्बोबॉक्सिंगचे सचिव यशवंत माने तसेच विविध राज्याचे एल्बोबॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष, कोच उपस्थित होते. रायगडच्या विद्यार्थांनी घवघवीत यश मिळविल्याने सर्व खेळाडुंचे अभिनंदन केले आहे.

# मोहम्मद आमिरला व्हिसा मिळेना!

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**



पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिरला टी २० विश्वचषकापूर्वी व्हिसाच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. आमिरने नुकतेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केले आहे. पाकिस्तान आणि आयर्लंड यांच्यात ३ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. मात्र या दौऱ्यापूर्वी पाकिस्तानसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. संघाचा स्टार वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिरला या दौऱ्यासाठी व्हिसा मिळू शकलेला नाही.

टी-२० विश्वचषकापूर्वी पाकिस्तानसाठी ही खूप महत्त्वाची मालिका आहे. अशा स्थितीत संघाच्या स्टार खेळाडूला व्हिसा न मिळणे ही खूप गंभीर बाब आहे. पाकिस्तानी मीडिया रिपोर्ट्समध्ये सांगण्यात आले की, टीम मॅनेजमेंटकडून मिळालेल्या माहितीनुसार आमिरच्या आयर्लंडला जाण्यास विलंब होणार आहे.

## भारतीय महिला अन् पुरुष संघ रिलेमध्ये दमदार

# पॅरिसमध्ये पदकासाठी धावणार



**। बहामास । वृत्तसंस्था ।**

**भारतीय महिला आणि पुरुष रिले संघ ४४०० मीटर रिलेमध्ये पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहेत. बहामास येथे सुरू असलेल्या जागतिक ॲथलेटिक्स रिलेमध्ये सोमवारी भारतीय महिला संघाने दुसऱ्या फेरीतील हीटमध्ये दुसरे स्थान पटकावले. तर पुरुष संघानेही दुसऱ्या हीटमध्ये दुसरे स्थान मिळवून पात्रता मिळवली.**

रुपल चौधरी, एम आर पूवम्मा, ज्योतिका श्री दांडी आणि सुभा वेंकटेशन यांनी तीन मिनिटे आणि २९.३५ सेकंदात जमैका (३:२८.५४) च्या मागे हीट नंबर वनमध्ये दुसरे स्थान पटकावले. भारतीय संघाने रविवारी पहिल्या फेरीच्या पात्रता फेरीत तीन मिनिटे आणि २९.७४ सेकंद वेळेसह पाचवे स्थान पटकावले होते.पुरुष संघाने पटकावला दुसरा क्रमांक मोहम्मद अनस याहिया, मोहम्मद अजमल, अरोकिया राजीव आणि अमोज जेकब यांच्या पुरुष संघाने ३:३.२३ सेकंदांची वेळ नोंदवत अमेरिकेच्या (२:५९.९५) मागे दुसरे स्थान पटकावले. दुसऱ्या फेरीतील तीन हीटमधील अव्वल दोन संघ पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरतील अशी माहिती आहे. पॅरिस ऑलिम्पिक यावर्षी २६ जुलै ते ११ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताकडे १९ ट्रॅक आणि फील्ड ॲथलीट आहेत. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा देखील आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धा १ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.

# तंत्रज्ञानाचा वापर खेळासाठी चांगला

## महिला कसोटी पंच वृंदा राठी यांचे मत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



तंत्रज्ञानामुळे खेळ सोपा होत असून याचा खेळाला फायदा होत आहे. पंच म्हणून अनेकदा चुकीचे निर्णय सुधारले जात आहेत. खेळाला याचा फायदा होत असल्याने माझी तंत्रज्ञानाला पसंती आहे,असे मत भारताच्या पहिल्या महिला कसोटी पंच वृंदा राठी यांनी व्यक्त केले.

माटुंगा येथे १६ वर्षांखालील कल्पेश कोळी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेसाठी उपस्थित राहिलेल्या राठी यांनी म्हटले की, अनेकदा चुकीचे निर्णय दिल्यानंतर वाईट वाटतं. त्याचवेळी डीआरएसमुळे अशा निर्णयांमध्ये सुधारणा झाल्याचे समाधानही वाटतं.

पंच म्हणून आम्हाला शिकण्यासही मिळते. आम्ही यानुसार अभ्यास करून कामगिरीत अधिक सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. खेळासाठी हे तंत्रज्ञान खूप चांगले आहे.सुरुवातीला स्कोअरर म्हणून काम करणाऱ्या राठी यांनी २०१३ पासून पंच म्हणून सुरुवात केली. २०२० मध्ये आयसीसी पंच समितीमध्ये समावेश झालेल्या राठी यांनी आतापर्यंत महिला टी-२० विश्वचषक, राष्ट्रकुल स्पर्धा, आशियाई क्रीडा स्पर्धा, डब्ल्यूपीएल अशा अनेक स्पर्धांमध्ये पंचगिरी केली आहे.

त्यांनी सांगितले की, पुरुष क्रिकेटपटूंना महिला पंचांचा स्वीकार करण्यात वेळ गेला. पुरुष क्रिकेटमध्ये पंचगिरी करणे आव्हानात्मक होते. सुरुवातीला खेळाडूंकडून खूप दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला.

अनेकदा विनाकारण फलंदाज बाद असल्याचे अपील करत आमच्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न झाला. कधी कधी आताही असे प्रयत्न होतात. पण, आम्ही ठामपणे निर्णय देत असल्याने असे प्रकार आता कमी झाले आहेत. पुरुष क्रिकेटपटूंना महिला पंचांच्या क्षमतेची जाणीव झाल्याने आता फारशा अडचणी येत नाहीत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२९९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)